**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ५/०३/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१४ शुक्रवार दि.११/०३/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**शुक्रवार दिनांक- ११/०३/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ९१ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ९२ | श्री. दशरथ रामा चांदणे, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९३ | श्री. अशोक रामा कदम, शिपाई यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९४ | श्री. अनिल गुलाब मांजुरे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागात रक्त घटक निर्मिती सेवा पुरविणे कामी आवश्यक साहित्य व उपकरणे स्टोअर विभागामार्फत जाहिर निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये ३० लाख फक्तचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ९६ | श्री. बळवंत सर्जेराव ठुबे (श्रीमती जयश्री काशिनाथ झावरे) यांचे श्रीरामनगरी आगरकर मळा स्टेशन रोड येथील सर्व्हे नं.७६/२अ२ प्लॉट नं.१५व १६ या प्लॉटचे एकत्रीकरण झाल्यामुळे व त्यावर केलेले बांधकामावर कर आकारणी केलेली असल्याने प्लॉट नं.१६ चे ओपन प्लॉटवर आकारणी केलेले सन २००७ ते २०११ अखेर रूपये ३०२८/- बील क्रमांक १०६२ दि.१७/६/२०१० चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९७ | सौ.सिंधू वसंतराव दळवी,घर नं. १८६३ डायाभाई रोड झेंडीगेट अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकीने आकारलेली पाणीपट्टी रूपये १३,७००/- वॉर्ड क्रमांक ५ बील क्रमांक २७१ निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९८ | अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य/ घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे महानगरपालिकेच्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता शासनाचे नोंदणीकृत संस्था / एजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९९ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.२ मधील रेणुकानगर शिवशंभो सोसायटी औरंगाबाद रोड ते श्री. डहाके घरादरम्यान ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे प्रकरणी श्री. दिलावर खान महेबुब खान, रा. अकबर नगर औरंगाबाद रोड यांनी मे. कोर्टात दाखल केलेल्या रे.मु.नं. ४८४/२००८ प्रकरणी म.न.पा. विधीसल्लागार श्री. बाबर टि.ई. यांचे मतानुसार ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १०० | अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत कमांडींग ऑफिसर, ५७ महाराष्ट्र बटालीयन एन.सी.सी. नगर-मनमाड रोड यांचा व वरिष्ठ भुवैज्ञनिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १०१ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्र.४, अंतिम भूखंड क्रमांक १२९ (पैकी) सावेडी प्रोफेसर कॉलनी चौक येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाचे जागेत एफ.बी.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे कामी महासभा ठराव क्रमांक ३८ दिनांक २२/६/२०१० चे मंजूर अटीस अधिन राहून सदर प्रकल्पाची सुधारित वाढीव प्रिमियम रक्कम रूपये १३ कोटी ५५ लाख इतकी निश्चित करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०२ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २,९६,०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०३ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्र.९२ भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१९ बुरूडगाव रस्ता ही जागा एफ.बी.टी. तत्वावर विकसीत करणेस मा.महासभा ठराव क्रमांक ३९ दिनांक २२/६/२०१० मधील प्रिमियमची रक्कम वगळता उर्वरित बाबी कायम ठेवुन सुधारित नकाशासह प्रिमियम रक्कम रूपये १०,०४,२८,०००/- इतकी निश्चित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

...३

| | |
|---|---|
| १०४ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्टेशन रोड जुने बसस्थानक माळीवाडा येथील (वॉर्ड क्रमांक १९ बील क्र. २३५) बंद नळ कनेक्शनची वसुल न होणारी थकबाकी निर्लेखित करण्यांस व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून १ इंची नळ कनेक्शची पाणीपट्टी रूपये २२,०००/- प्रमाणे आकारण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०५ | विळद पंपींग स्टेशन येथून मौजे पिंपरी घुमट ग्रामपंचायत ता. नगर जिल्हा अहमदनगर या गावांसाठी विळद पंपींग स्टेशन येथून पिण्याच्या पाण्याचे १ इंची नळ कनेक्शन देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून पद्मश्री डॉ. विठ्ठराव विखे पाटील फौन्डेशनचे एम.बी.ए. कॉलेज करिता २" इंची पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १०७ | अहमदनगर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता म.न.पा. हद्दीत जमा होणारा घनकचरा (ओला सुका) चे संकलन वाहतुक व विल्हेवाट लावणे कामी आवश्यक वाहने खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये १,१२,०१,३५५/-चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १०८ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम, पाणी पुरवठा व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता पदी मानधनावर नेमणूका करणेकामी शैक्षणिक अर्हता ठरविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १०९ | मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ८७ दि. १२/१/२०११ चा अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन या पदांची संख्या शैक्षणिक अर्हता व वाढीव मानधन ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्रमांक ९१ मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ९२ ते १०९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९१ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९१ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री.पवार बा.रे. :- मागिल सभा दिनांक १२/०१/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा क्रमांक १२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक १२ बुधवार दिनांक १२/०१/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सही /-

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४

विषय क्रमांक-९२ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९२ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. दशरथ रामा चांदणे, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अ.नगर म.न.पा. कामगार विभाग-वशि नं. ६३ दिनांक ५/१०/२०१०

प्रति, प्रभारी नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस,

आरोपीत कर्मचारी श्री. दशरथ रामा चांदणे, बिगारी यांचेवरील आस्था. आदेश २२८३ दि.५/८/२००९ अन्वये आरोपपत्र क्र.५५८ दि.१४/९/२००९ चे खातेनिहाय चौकशी अंती त्यांनी आरोप कबुल केल्याने व त्यांचे वरील आरोप शाबीत झाल्याने त्यांना "तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतुन काढून टाकण्यात येत आहे." अशी शिक्षा का करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीस त्यांनी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना सुचविलेली शिक्षा करणे योग्य असल्याने व सदरच्या शिक्षेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (अ) मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असल्याने मा. स्थायी समिती समोर घेणे कामी पुढील कार्यवाहीस.

येणे प्रमाणे प्रभारी कामगार अधिकारी यांचा अहवाल असे. दि.४/१०/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- खाते निहाय चौकशी अंती श्री. दशरथ रामा चांदणे यांचेवर ठेवलेले आरोप सिध्द झालेने त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सदर कर्मचारी किती दिवस गैरहजार आहे.

कामगार विभाग श्री. शित्रे :- श्री. दशरथ रामा चांदणे यांचा एकूण गैरहजर कालावधी २७५९ दिवस असून दिनांक ७/४/२००९ पासून ते गैरहजर आहेत.

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- २७५९ दिवस म्हणजे साडेसात वर्षे ते कामावर गैरहजर आहेत. त्यांना त्याबाबत यापूर्वी ही वेळोवेळी शिक्षा करण्यांत आलेल्या आहेत.

मा.सौ. ढोणे मा.सु. **व** मा.सौ. ढवण शारद दिंगबर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.ढोणे मा.सु.,मा.सौ.ढवण शा. दि. **व** मा.सौ. शिंदे शि.अ.:- श्री. दशरथ रामा चांदणे, श्री. अशोक रामा कदम व श्री. अनिल मांजूरे यांना एक वेळ संधी देण्यांत यावी. त्यांना पुनःश्च कामावर घेण्यात यावे.

मा.श्री. पवार द.ज.:- त्यांना एक वेळ संधी देण्यांत यावी. श्री. दशरथ रामा चांदणे, श्री. अशोक रामा कदम ,श्री. अनिल गुलाब मांजुरे हे जर कामावर हजर झाले नाहीत व कामावर हजर झाले नंतर ते गैरहजर राहिल्यास त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणेची कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- त्यांना कामावर घ्यावे, एक वेळ संधी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते श्री.दशरथ रामा चांदणे, श्री.अशोक रामा कदम,श्री.अनिल गुलाब मांजुरे यांना एक वेळ संधी देण्यांत यावी. त्यांना कामावर हजर करून घ्यावे ते जर कामावर हजर झाले नाहीत व हजर झाले नंतर ते गैरहजर राहिल्यास त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा देण्यांत यावी.

**ठराव :-** श्री. दशरथ रामा चांदणे, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

श्री. दशरथ रामा चांदणे, बिगारी यांना एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र ते जर कामावर हजर झाले नाही व कामावर हजर झाले नंतर ते पुन्हा गैरहजर राहिले तर त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करण्यांत यावी.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९३ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९३ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.अशोक रामा कदम, शिपाई यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अ.नगर म.न.पा. कामगार विभाग-वशि नं. ६५ दिनांक १४/१०/२०१०

प्रति, प्रभारी नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस,

आरोपीत कर्मचारी श्री.अशोक रामा कदम, शिपाई यांचेवरील आस्था. आदेश ३२७१ दिनांक २८/१०/२००९ अन्वये आरोपपत्र क्र.१२०४ दि.१०/११/२००९ चे खातेनिहाय चौकशी अंती त्यांनी आरोप कबुल केल्याने व त्यांचे वरील आरोप शाबीत झाल्याने त्यांना "तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतुन काढुन टाकण्यात येत आहे" अशी शिक्षा का करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली होती.सदर नोटीशीस त्यांनी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना सुचविलेली शिक्षा करणे योग्य असल्याने व सदरच्या शिक्षेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) (अ) मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असल्याने मा.स्थायी समितीसमोर घेणेकामी पुढील कार्यवाहीस्तव.

येणेप्रमाणे प्रभारी कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u>** श्री. अशोक रामा कदम, शिपाई यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

श्री. अशोक रामा कदम, शिपाई यांना एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र ते जर कामावर हजर झाले नाही व कामावर हजर झाले नंतर ते पुन्हा गैरहजर राहिले तर त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करण्यांत यावी.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९४ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९४ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.अनिल गुलाब मांजुरे,सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अ.नगर म.न.पा. कामगार विभाग- वशि जा.नं.१३० दिनांक २५/१/२०११

प्रति,
प्रभारी नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

यांस,

आरोपीत कर्मचारी श्री. अनिल गुलाब मांजुरे, स.का. यांचेवरील आरोपपत्र क्र.२५२ दि. ११/१०/२०१० चे खातेनिहाय चौकशी अंती त्यांनी आरोप कबुल केल्याने व त्यांचे वरील आरोप शाबीत झाल्याने तसेच त्यांचा एकंदर गैरहजर कालावधी १८३९ दिवस व दि. ११/९/२००७ पासून सलग गैरहजेरी पहाता त्यांना "तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतुन काढुन टाकण्यात येत आहे " अशी शिक्षा का करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली होती. सदर नोटीशीस त्यांनी दिलेल्या खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना सुचविलेली शिक्षा करणे योग्य असल्याने व सदरच्या शिक्षेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (अ) मा.स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असल्याने मा. स्थायी समिती समोर घेणे कामी पुढील कार्यवाहीस्तव.

येणे प्रमाणे प्रभारी कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u>** श्री. अनिल गुलाब मांजुरे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

श्री. अनिल गुलाब मांजुरे, सफाई कामगार यांना एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र ते जर कामावर हजर झाले नाही व कामावर हजर झाले नंतर ते पुन्हा गैरहजर राहिले तर त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करण्यांत यावी.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९५ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९५ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागात रक्तघटक निर्मिती सेवा पुरविणे कामी आवश्यक साहित्य व उपकरणे स्टोअर विभागामार्फत जाहिर निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये ३० लाख फक्तचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह दि.२७/१०/२०१०
सादर,

विषय :-अहमदनगर महानगरपालिकेच्या (रक्तपेढी विभागात) रक्तपेढी विभागात रक्तघटक निर्मिती सेवा पुरविणेसाठी आवश्यक साहित्य व उपकरणे स्टोअर विभागामार्फत खरेदी करणेबाबत.

संदर्भ :- मा. महासभा ठराव क्रमांक १३ दिनांक १०/०८/२००९

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार विनंतीपुर्वक रिपोर्ट करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी गेल्या २४ वर्षापासून गोरगरीब व समाजाच्या सर्व स्तरांच्या जनतेसाठी २४ तास अत्यावश्यक सेवा देत आहे. सध्या रक्तपेढी द्वारे संपुर्ण रक्त (whole Human Blood) रूग्णांना पुरविले जाते. तथापि दिवसेंदिवस आधुनिक उपचार पध्दतीनुसार डॉक्टरांची मागणी रक्तघटक यासाठी आहे. सध्या अहमदनगर शहरात जनकल्याण रक्तपेढी यांच्याकडे रक्तघटक निर्मिती व्यवस्था आहे. तसेच अहमदनगर सामान्य जिल्हा रूग्णालय येथे रक्तघटक निर्मिती साठी कार्यवाही प्रसतावीत असल्याचे समजते. रक्तघटकाची वाढती मागणी पहाता रूग्णसेवेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिका रक्तपेढी मध्ये रक्तघटक निर्मिती सेवा सुरू करणे आवश्यक आहे.

सध्या whole Human Blood चे रक्तपिशवी रक्तदाता असल्यास (Replacement Doner / Voluntary Card) असल्यास रू.२५०/- व रक्तदाता नसल्यास रू.४००/- सेवा शुल्क घेवुन वितरीत केले जाते. रक्तघटक निर्मितीसाठी १ रक्त पिशवी पासून P.C.V., F.F.P., Platelet अशा तीन घटकांची निर्मिती होवुन रक्त पिशवीचे दर प्रत्येक रक्तघटकास रू.२५०/- रक्तदाता असल्यास व रू.४००/- रक्तदाता नसल्यास अशा प्रकारे महानगरपालिकेचे उत्पन्न दरवर्षी अंदाजे रू.३५ लाख ते ४० लाख होवु शकते.

सदरच्या रक्तघटक निर्मिती सेवा सुरू करणे बाबत मा. महासभा ठराव क्र.१३ दिनांक १०/०८/२००९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. रक्तघटक निर्मिती सेवा सुरू करणे कामी खालील प्रमाणे साहित्य व उपकरणांची आवश्यकता आहे.

| अ.नं. | साहित्य / उपकरणाचे नाव |
|---|---|
| १ | एअर कंडीशनर |
| २ | लॅमिनर एअर फलो बेंच |
| ३ | सुटेबल रेफ्रीजरेटेड सेंट्रीफ्युज |
| ४ | प्लाझमा एक्सप्रेसर |
| ५ | डाय इलेक्ट्रीक सिलर |

| | |
|---|---|
| ६ | वेईंग डिव्हाइस |
| ७ | ड्राय रबर बॅलसिंग मटेरियल |
| ८ | आरटेरी फोरसेप्स, सिझर्स |
| ९ | २ ते ६ सेंटीग्रेड तपमान नियमित ठेवणारे रेफ्रीजरेटर |
| १० | प्लेटलेट एजिटेटर व इंधनक्युबेटर |
| ११ | -३० ते -४० डीग्री सेंटीग्रेड चे डिप फ्रिजर |
| १२ | -७५ ते -८० डीग्री सेंटीग्रेड चे डिप फ्रीजर |
| १३ | प्लाझमा वितळवण्यासाठी रेफ्रीजरेटेड वॉटर बाथ |
| १४ | इंन्सुलेटेड ब्लड बॅग कंटेनर्स |

वरील यंत्र सामुग्री खरेदीसाठी अंदाजे रू.३०,००,०००/- (रू. तीस लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी वरील प्रमाणे यंत्र सामुग्री स्टोअर विभागामार्फत निविदा मागवून खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रू.३०,००,०००/- चे खर्चास मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समिती ठेवणेस सविनय सादर.

**अंदाजपत्रकीय तरतूद** **म.न.पा. रक्तपेढीसाठी औ. व उ. खरेदी रू. ३७,००,०००/-**
**२०१०-२०११** **झालेला खर्च रू.५,९५,८६५=५०**
**उपलब्ध शिल्लक रू. ३१,०४,१३४=५०**

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

मुख्यवैद्यकीय अधिकारी :- रक्तपेढी अन्याधुनिकरणाकरिता व रक्तघट सेवा सुरू करणेकामी साहित्य व उपकरण खरेदी स्टोअर विभागामार्फत होणेस मा.स्थायी समितीकडे निविदा मागविलेकामी मंजूरीस्तव पाठविणे उचित वाटते.

मुख्यलेखापरिक्षक तथा उपायुक्त (कर) :- रक्तपेढी व आधुनिक करण व रक्तघटक सेवा सुरू करणेसाठी साहित्य व उपकरण स्टोअर विभागामार्फत खरेदी करणेबाबतचा विषय मा.स्थायी समिती पुढे चर्चेस ठेवणेत यावा. **/अ**

मुखलेखाअधिकारी :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त साहेब :- रक्तपेढी व आधुनिकीकरण व रक्त घटक सेवा सुरू करणेसाठी साहित्या व उपकरण स्टोअर विभागामार्फत खरेदी करणेबाबतचा विषय मा.स्थायी समितीपुढे चर्चेस ठेवणेत यावा. दि. २९/१०/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समितीपुढे पाठवा.दि.२९/१०/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागात रक्तघटक निर्मिती सेवा पुरविणे कामी साहित्य व उपकरणे खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. श्री. बोरगे :- महानगरपालिकेचे रक्तपेढी मार्फत नागरिकांचे मागणी प्रमाणे फक्त पुर्ण रक्त पिशव्या दिल्या जातात. परंतु गेल्या काही दिवसापासून अधुनिक उपचार पध्दती नुसार ट्रिटमेंटमध्ये बदल झालेला असून डॉक्टर रक्त घटकाची मागणी करतात. आपण पुर्ण रक्त पिशवी पुरवितो परंतु डॉक्टरची मागणी PVC,FFP, Platelet लेट अशा रक्त घटकाची मागणी करतात. त्यामुळे रक्त घटक निर्मिती सेवा सुरू करणे आवश्यक आहे. अहमदनगर शहरामधील रक्त पेढयांनी त्याप्रमाणे रक्त घटक पुरविणेची सेवा सुरू केलेली आहे. आपणास रक्त घटक सेवा सुरू करणेकामी आवश्यक साहित्य व उपकरणाची खरेदी करणे आवश्यक आहे. सदर सेवा सुरू करणेकामी मंजुरी मिळलेली आहे. तरी म.न.पा.चे रक्त पेढी विभागात रक्त घटक निर्मिती सेवा पुरविणेसाठी स्टोअर विभागामार्फत आवश्यक साहित्य खरेदी करण्यांस व खर्चास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागात रक्तघटक निर्मिती सेवा पुरविणे कामी आवश्यक साहित्य व उपकरणे स्टोअर विभागामार्फत जाहिर निविदा मागवून खरेदी करण्यांस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ३०,००,०००/-(रूपये तीस लाख फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९६ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९६ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.बळवंत सर्जेराव ठुबे(श्रीमती जयश्री काशिनाथ झावरे) यांचे श्रीरामनगरी आगरकर मळा स्टेशन रोड येथील सर्व्हे नं.७६/२अ२ प्लॉट नं.१५ व १६ या प्लॉटचे एकत्रीकरण झाल्यामुळे व त्यावर केलेले बांधकामावर कर आकारणी केलेली असल्याने प्लॉट नं.१६चे ओपन प्लॉटवर आकारणी केलेले सन२००७ते २०११अखेर रूपये३०२८/- बील क्रमांक१०६२ दि.१७/६/२०१० चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ जा.क्र. दि. /१०/२०१०
सादर,

अर्जदार बळवंत सर्जेराव ठुबे, रा. श्रीरामनगरी आगरकरमळा यांनी दिनांक ०६/०९/२०१० रोजी अर्ज सादर करून सर्व्हे नं. ७६/२अ मधील प्लॉट नं.१६ हा रिकामा दाखवुन प्लॉट नं.१६ वर कर आकारणी रद्द करणे बाबत विनंती केली आहे.

स.नं.७६/२अ र प्लॉट नं.१५ व १६ हे दोन प्लॉटचे एकत्रीकरण झाले आहे. व सदर प्लॉट नं.१५ वर ठराव क्र.५७४ दिनांक ३०/०१/२००६अन्वये तळमजला+पहिला मजल्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेने परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे अर्जदाराने प्लॉट नं.१५ वर बांधकाम पुर्ण करून रहिवास वापर सुरू केला आहे व सदर बांधकामास नियमानुसार कर आकारणी केली आहे. परंतु प्लॉट नं.१६ चे ओपन प्लॉटचे बिल अद्यापपर्यत अर्जदारास दिले जाते सन २००७/०८ पासून १५ व १६ चे एकत्रीकरण झाल्यामुळे प्लॉट नं.१६ चे ओपन प्लॉटचे आकारलेले बिल रद्द करणेबाबत आपले स्तरावर आदेश व्हावेत व संगणक, रिव्हीजन रजिस्टर व टाचण रजिस्टर दुरूस्ती करणेस आदेश व्हावेत.

येणे प्रमाणे प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.४ यांचा अहवाल असे.

सहा. मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी :- सादर, प्रस्तुत प्रकरणातील भुखंड क्र.१५ व १६ अशा दोन स्वतंत्र भुखंडावर कर आकारणी करण्यात आलेली होती. संबंधीत जागा मालक यांनी भुखंड क्र. १५ व १६ चे क्षेत्र एकत्र करून ठराव क्र.५७४ दि.३०/१/२००६ अन्वये बांधकाम परवानगी घेतलेली आहे. त्यावेळेस दोन्ही खुल्या भुखंडाची कर आकारणी कमी करून नविन बांधकामाची आकारणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन ०७/०८ वर्षात नवीन बांधकामाची आकारणी केलेली आहे.

त्यापैकी प्लॉट नं.१५ ची कर आकारणी कमी करून प्लॉट नं.१६ ची आकारणी नजर चुकीने तशीच राहुन गेलेली आहे. सदरच्या दोन्ही भुखंडावर बांधकाम झालेले आहे. त्यामुळे सध्या भुखंड क्र. १६ चे आकारणीचे बील रद्द करणे आवश्यक आहे. त्यावरील भुखंडाची कराच्या आकारणीची रक्कम वसुल न होणारी आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती कडे बिलावरील रक्कम रूपये ३०२८/- निर्लेखित करणे विषयी आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) साहेब :- प्रस्तावीत केल्यानुसार कराची वसुल न होणारी रक्कम रूपये ३०२८/- निर्लेखित करणेबाबतचा विषय स्थायी समितीपुढे चर्चेसाठी ठेवणेत यावा.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२७/१२/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री. बळवंत सर्जेराव ठुबे यांचे स्टेशन रोड आगरकर मळा येथील स.नं. ७६/२अ२ प्लॉट नं.१६ चे ओपन प्लॉटवर केलेली आकारणी निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

प्रभाग समिती क्र-४ श्री. बुचकुल :- सदरचे सर्व्हे नं.७६ /२अ२ मधील प्लॉट क्रमांक १५ व १६ या दोन प्लॉटचे एकत्रिकरण करून प्लॉट नं.१५ वर बांधकाम केलेले असून सदर इमारतीवर नियमानुसार कर आकारणी केलेली आहे. प्लॉट नं. १५ व १६ चे एकत्रिकरण झाल्याने प्लॉट नं.१६ चे ओपन प्लॉटचे आकारलेले बील निर्लेखित करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास मंजूरी मिळावी.

मा.श्री.पवार बा.रे. **व** मा.श्री. बारस्कर पो.ज.:- याप्रमाणे बीले निर्लेखित करणेबाबतची आणखी प्रकरणे आहेत का ?

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- घरपट्टी आकारणीची बीले निर्लेखित करणे बाबतची प्रकरणे ज्याप्रमाणे येतील त्याप्रमाणे ती मा.स्थायी समिती पुढे मंजूरीसाठी सादर करण्यांत येतील.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** श्री.बळवंत सर्जेराव ठुबे(श्रीमती जयश्री काशिनाथ झावरे) यांचे श्रीरामनगरी आगरकर मळा स्टेशन रोड येथील सर्व्हे नं.७६/२अ२ प्लॉट नं.१५ व १६ या प्लॉटचे एकत्रीकरण झाल्यामुळे व त्यावर केलेले बांधकामावर कर आकारणी केलेली असल्याने प्लॉट नं.१६चे ओपन प्लॉटवर आकारणी केलेले सन २००७ ते २०११अखेर रूपये ३०२८/-(रूपये तीन हजार अठ्ठावीस फक्त) चे बील क्रमांक १०६२ दि.१७/६/२०१० चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९७ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९७ शुक्रवारदिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** सौ. सिंधू वसंतराव दळवी, घर नं. १८६३ डायाभाई रोड झेंडीगेट,अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकीने आकारलेली पाणीपट्टी रूपये १३,७००/- वॉर्ड क्रमांक ५ बील क्रमांक २७१ निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ (झेंडीगेट) दि.१३/५/२०१०

विषय- नळ कनेक्शन नसातांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ- सौ. सिंधु वसंतराव दळवी यांचा दिनांक १५/४/२०१० रोजीचा अर्ज.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, सौ. सिंधु वसंतराव दळवी, रा. डायाभाई रोड, झेंडीगेट घर नं.१८६३ अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २०१० पासून अचानक पाणीपट्टी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यात आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे. अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.५ बि.क्र. २७१ वर सौ. सिंधु वसंतराव दळवी यांची मिळकत असुन त्यांच्या नांवे सन २००९-२०१० अखेर घरपट्टी रू.१०६०/- व पाणी पट्टी रू.१३७००/- असे दोन्ही मिळुन रू.१४७६०/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी सौ. सिंधु वसंतराव दळवी , रा. डायाभाई रोड झेंडीगेट घर नं. १८६३ यांच्या घराची नळ कनेक्शची दि.१२/४/२०१० रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.१५/४/२०१० रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००३ मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५ नुसार पाणीपट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वॉर्ड क्र.५ वसुली लिपीक / मदतनीस यांचा अहवाल असे.

प्रभाग समिती क्र.३ लिपिक :- वसुली लिपिक व नळ जोड फिटर यांच्या अहवालाचे अवलोकन केले.

सन १९९३-९६ चे वसूली अभिलेख पाहता, नळ जोड नसल्याचे दिसून येते सन २००३-०४ मध्ये माजी सैनिक संस्थेने, केलेल्या अनधिकृत सर्व्हेक्षणामध्ये, चुकीच्या नोंदी घेतल्याचे दिसून येते. सबब मुं.प्रां. म. न. पा.अधिनियम १९४९ चे कलम ४८५ नुसार सदर पाणी पट्टी आकारणी रद्द करणे संयुक्ती वाटते.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र. :- मा. कर निरीक्षक यांचे अहवालास सहमत

सहाय्यक मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी :- प्रभाग अधिकारी प्र.क्र. ३ मुंबई प्रां. म.न.पा. अधि. १९४९ चे कलम ४८५ चा खुलासा करणेत यावा.

प्रभाग समिती क्रमांक-३ :- फेरसादर, सदर प्रकरणी यापूर्वी सदरचे बील न नळ जोड नसल्याने आढळते परंतु ०३/०४आर्थिक वर्षा मध्ये माजी सैनिक संस्थेकडून अनाधिकृत नळाचे सर्व्हेक्षण चुकीचे आले मुळे नळ नोंद आढळते. सबब कलम४८५(१)अन्वये दुरूस्ती करणे संयुक्तीक असून मु.प्रां. मनपा अधिनियम १९४९चे कलम १५२अनुसार असलेली बाकी रू.१३७००/- निर्लेखित करणे बाबत कार्यवाही अपेक्षीत.

सहाय्यक मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी :- सादर, सबब कलम ४८५ (१) अन्वये दुरूस्ती व मुं. प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार असलेली बाकी १३७००/- निर्लेखित करणे बाबत सादर, /**अ**

सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस सादर.

मु ले प / उपायुक्त (कर) :- चुकीने आकारलेले करांची रक्कम रू.१३७००/- निर्लेखितास मान्यता द्यावी. दि.७/१२/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती ठरावाची आवश्यकता नाही का ? दि१५/१२/२०१०

मु ले प / उपायुक्त (कर) :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ कलम १५२ नुसार कर निर्लेखिताचा प्रस्ताव स्थायी समिती पुढे चर्चेस ठेवणेत यावा. दि ०७/०१/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ०७/०१/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सौ. सिंधु वसंतराव दळवी, घर नं. १८६३ झेंडीगेट यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकीने आकारलेली पाणीपट्टी निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिति सांगावी.

झोन क्र.२ श्री. वर्मा के.सी. :- सौ. सिंधू वसंत दळवी घर नं. १८६३ डायाभाई रोड यांचे घरास नळ कनेक्शन नसतांनाही त्यांना आकारणी केले बाबतचे अर्जान्वये जागेची पहाणी केलेनंतर सदर मिळकतीस नळ कनेक्शन नसल्याचे आढळल्याने सदरचे चुकीने आकारलेली पाणीपट्टी निर्लेखित करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** सौ. सिंधू वसंतराव दळवी, घर नं. १८६३ डायाभाई रोड झेंडीगेट,अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकीने आकारलेली पाणीपट्टी रूपये १३,७००/-(रूपये तेरा हजार सातशे फक्त) चे वॉर्ड क्रमांक ५ बील क्रमांक २७१ निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९८ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९८ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे महानगरपालिकेच्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता शासनाचे नोंदणीकृत संस्था / एजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका अ,.नगर आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन जा.क्र. ३५३ दि.४/१/२०११

प्रति,
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

विषय- महानगरपालिका आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहरात निर्माण होणा-या कचराचे म.न.पा.च्या वाहनांमार्फत संकलन व वाहतूक करणे करीता शासनाचे नोंदणीकृत संस्था/ एंजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे बाबत प्राप्त निविदा दरास स्थायी समितीची मंजुरी मिळण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, घन कचरा व्यवस्थापन विभागासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे बाबत एक वर्षाकरीता देय दराची सिलबंद फेर निविदा दि.२१/१२/१० ते दि.२३/१२/१० दरम्यान मागविण्यांत आली होती.

वरील निविदा दि.२४/१२/२०१० रोजी उपायुक्त (कर) यांचे दालनात निविदा (तांत्रिक लिफाफा क्र.१) उघडण्यात आली. तसेच दरपत्रके दि.३१/१२/१० रोजी उघडण्यात आले. त्या वेळेस लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था औरंगाबाद या संस्थेचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याचे दिसुन आले. सदर बाबत खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशिल | निविदाकाराने निविदे मध्ये नमूद केलेले दर (रक्कम रू.) |
|---|---|---|
| १ | विषय- महानगरपालिका आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्य वाहनांमार्फत संकलन व वाहतुक करणेकरिता शासनाचे नोंदणीकृत संस्था / एंजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे बाबत. | प्रति वाहन चालक प्रति महा दर ४८००/- (चार हजार आठशे रू.) |

वरील प्रमाणे प्राप्त दर पत्रकानुसार लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था औरंगाबाद या संस्थेचे दर तुलनात्मक दृष्टया कमी दराचे असल्याने सदर संस्थेस दि.४/१/२०११ रोजी दु.४.०० वा. मा.उपायुक्त साहेब यांच्या समक्ष मुख्य लेखा अधिकारी व घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांच्या उपस्थिती मध्ये सदर संस्थेच्या प्रतिनिधीस बोलवुन वाटाघाटी करण्यात आली.

वाटाघाटीनुसार लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था औरंगाबाद संस्थेचे प्रतिनिधी यांनी खालील प्रमाणे दर मान्य केले आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशिल | निविदाकाराने वाटाघाटीमध्ये मान्य केलेले दर |
|---|---|---|
| १ | विषय-महानगरपालिका आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्य वाहनांमार्फत संकलन व वाहतुक करणेकरिता शासनाचे नोंदणीकृत संस्था / एंजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे बाबत. | प्रति वाहन चालक प्रति महा दर ४७००/माह/वाहनचालक |

तरी वाटाघाटी नंतर मान्य करण्यात आलेल्या दरास अंतीम मंजूरीसाठी मा.आयुक्त साहेबांचे आदेशानुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव नजीकच्या स्थायी समिती सभेमध्ये विषय घेण्यात यावा ही विनंती.

सही/-
मा.उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे महानगरपालिकेचे वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकामी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. पवार बा.रे. :- आपणाकडेस किती वाहने आहेत ? किती ड्रायव्हर आवश्यक आहेत.

उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर :- टाटा ४०७ (टिपर) १५ टाटा ACE (घंटागाडी) १५ व डंपर प्लेसर दोन यांप्रमाणे वाहने असून एकूण ३२ ड्रायव्हरची आवश्यकता आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- आपलेकडील एखादे वाहन बंद पडले तर त्याचे दुरूस्तीसाठी किती कालवधी लागतो.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:-दुरूस्ती मोठया प्रमाणातील असेल दुरूस्तीसाठी खर्च जास्त येत असल्यास वाहनाचे दुरूस्तीसाठी कोटेशन वैगरेची प्रोसिजर करावी लागते. प्रोसिजर पूर्ण झाले नंतर वाहनाची दुरूस्ती कामी वर्कऑर्डर देवुन वाहनाची दुरूस्ती करून घेण्यात येते त्यास निश्चित असा कालावधी ठरविता येत नाही.

मा.श्री.पवार बा.रे. :- बंद पडलेल्या वाहनांचे जागी दुसरे वाहन कामाला लावले पाहिजे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- आरोग्य विभागास बंद वाहनाचे जागी दूसरे वाहन लावून काम पूर्ण करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

मा.श्री.पवार बा.रे. :- आता आपण ट्रॅक्टर वैगरे वाहनाची खरेदी करणार आहोत त्यास ड्रायव्हर लागणार आहेत. त्याचे काय

उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर :- ड्रायव्हरची आवश्यक्ता लागेल तेव्हा या संस्थे कडून मंजूर दराने ड्रायव्हर लावले जातील.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्टप्रमाणे आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे महानगरपालिकेच्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता शासनाचे नोंदणीकृत संस्था / एजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता कमीचे निविदर दर धारक "लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था औरंगाबाद" यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या प्रती वाहन चालक प्रती महा दर रूपये ४७००/-(रूपये चार हजार सातशे फक्त) चे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-९९ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -९९ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील रेणुकानगर शिवशंभो सोसायटी औरंगाबाद रोड ते श्री. डहाके घरादरम्यान ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे प्रकरणी श्री. दिलावर खान महेबुब खान, रा. अकबर नगर औरंगाबाद रोड यांनी मे. कोर्टात दाखल केलेल्या रे.मु.नं. ४८४/२००८ प्रकरणी म.न.पा. विधीसल्लागार श्री.बाबर टी.ई. यांचे मतानुसार ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम वि. जा.क्र. २३ दि.१४/१/२०११ प्रस्तावना-विषय-प्र.क्र. २ मध्ये रेणुकानगर शिवशंभो सोसायटी येथे औरंगाबाद रोड ते डहाके घर दरम्यान ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट करण्यात येतो की, वरील कामाचे कार्यादेश सा.बां.वि. निविदा /१३१७ दि.१७/२/०९ अन्वये चे.किर्ती इले. मजूर सह. संस्था तांगेगल्ली अहमदनगर मुदत २ महिने यांना देण्यात आले होते. सदरचे पाईप लाईन करते वेळी तेथील नागरिक श्री. दिलावर खान महेबुब खान रा. अकबरनगर औरंगाबाद रोड, अहमदनगर यांनी कामास विरोध करून रे.मु.नं. ४८४/२००८ कोर्टात दाखल करून कामास हरकत घेतली आहे.

परंतु श्री. दिलावर खान महेबुबखान यांनी दि.११/११/२०१० रोजी मा.आयुक्त यांचेकडे कोर्ट केस तडजोडी बाबत पुढिल प्रमाणे लेखी अर्ज दिलेला आहे. "माझ्या मालकीच्या महानगरपालिका हद्दीतील अकबर नगर, औरंगाबाद रोड येथे असलेल्या जागेतुन पोलीस कॉलनी या परिसराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन टाकणेबाबत आपल्या महानगरपालिकेतील अधिकारी यांनी विनंती केली होती. प्रथमः त्याला मी विरोध केला. त्याबाबत पाईप लाईन न टाकणे करीता मी कोर्टात केस दाखल केली होती. आणि सदर कामाकरीता स्टे घेतला होता. परंतु त्या परिसरातील नागरिकांनी विनंती केल्यामुळे मी माझ्या जागेतुन पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन टाकुन देण्यास तयार झालो आहे. परंतु आपणास अशी विनंती आहे की, सदर पाईप लाईन ५ वर्षांनी महानगरपालिकेने स्वखर्चाने काढुन घेणे व सदर नागरिकांसाठी अन्यत्र व्यवस्था करावी. तसे महानगपालिकेने कोर्टात लिहुन दिल्यास मी या बाबत असलेली कोर्ट केस मागे मागे घेण्यास तयार आहे. तरी या बाबत योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती" असे कळविले आहे.

तरी परिसरातील नागरिकांना आवश्यक असणारी पाण्याची सोय महानगरपालिकेस करणे गरजेचे असल्याने श्री. दिलावर खान महेबुब खान यंचे जागेतुन जी.आय. पाईप लाईन ५ वर्षाकरीता टाकणे बाबत.त्यांनी वरील प्रमाणे कळविले नुसार सदरची पाईप लाईन ५ वर्षाने मनपाने काढुन घेणे व अन्यत्र व्यवस्था करणे याबाबत कोर्टात लेखी देणे बाबत महानगरपालिकेचे लिगल रिटेनर श्री. बाबर टी.ई. यांचे मत मागविले असता त्यांनी "महानगरपालिकेने आपले स्तरावर निर्णय घेणे उचित आहे" असे कळविले आहे.

सदर प्रस्तावास मा.आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समिती समोर ठेवणेबाबत संमती दिलेली आहे. सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक २ मधील रेणुकानगर शिवशंभो सोसायटी औरंगाबाद रोड ते श्री डहाके घर दरम्यान ६५ एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे प्रकरणी श्री. दिलावर खान महेबुब खान यांनी मे. कोर्टात दाखल केलेल्या रे.मु. नं.४८४/२००८ प्रकरणी मनपा विधी सल्लागार श्री. बाबर टी.ई. यांचे मतानुसार निर्णय घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- मनपा विधी सल्लागार ॲड श्री. बाबर यांनी माहिती द्यावी.

मनपा विधी ॲड श्री.बाबर टी. ई. :- मे.कोर्टात मनाई हुकूम दिल्यास परिस्थिती जैसे थे ठेवणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिका ते संकेत पाळीत नाहीत. सदर प्रकरणी मनपाचे आपले स्तरावर निर्णय घ्यावा.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- त्यास प्रशासन जबाबदार राहिल का ?

मनपा विधी ॲड श्री. बाबर टी. ई. :- होय

मा.सौ. ढोणे मा.सु. :- सदर प्रकरणी अधिकारी मे. कोर्टात हजर होतील का?

मनपा विधी ॲड श्री. बाबर टी. ई. :- मा.आयुक्त साहेब यांना मे. कोर्टात हजर व्हावे लागेल .

मा.सभापती साहेब :- श्री. सातपुते इंजि. यांनी माहिती सांगावी.

उपशहर अभियंता श्री. सातपुते आर.जी. :- अकबर नगर औरंगाबाद येथील श्री. दिलावर खान महेबुब खान यांनी त्यांचे जागेतुन पोलीस कॉलनी या परिसराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन टाकणेबाबतचे कामास त्यांनी प्रथम विरोध केला होता. त्यांनी मे. कोर्टामार्फत सदर कामास स्टे दिला होता. परंतु परिसरातील नागरिकांनी विनंती केल्यामुळे पाईप लाईन टाकून देण्यांस ते तयार झाले व त्यांनी अशी विनंती केली की, सदर पाईप लाईन पांच वर्षानी महानगरपालिकेने स्वखर्चाने काढून घ्यावी सदर नागरिकांसाठी पाणी पुरवठा करणेची अन्यत्र व्यवस्था करावी. तसे महानगरपालिकेने मे.कोर्टामध्ये लिहून दिल्यास ते कोर्ट केस मागे घेण्यास तयार आहेत. सदर प्रकरणी मनपा विधी सल्लागार ॲड श्री. बाबर टी.ई. यांचे मत मागविले असता त्यांनी महानगरपालिकेने आपले स्तरावर निर्णय घेणे उचित आहे असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव मा.सभेपुढे सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर जागी पाईप लाईन टाकणे करीता जागा नाही का ?

उपशहर अभियंता श्री. सातपुते आर.जी. :- नाही. रस्ता सुध्दा नाही.

मा.श्री. पवार बा.रे. :- पांच वर्षानंतर पाईप लाईन काढून घ्यावी तो पर्यत सदर भागास पाणी पुरवठा करणेसाठी पाईप लाईन टाकणेची सोय करण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज.:- प्रथम म.न.पा. विरूध्द श्री. दिलावर महेबुब खान यांनी मे. कोर्टात दाखल केलेला दावा काढून घ्यावा. तद्नंतर सदर प्रकरणी मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- मनपा विरूध्द दाखल असलेली कोर्ट केस काढून घेतले नंतरच सदर प्रकरणी मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते सदर प्रकरणी श्री. दिलावर खान महेबुब खान यांनी मे. कोर्टात दाखल केलेला दावा प्रथम त्यांनी मे. कोर्टातुन मागे घ्यावा तद्नंतरच सदर प्रस्ताव मा.सभेपुढे निर्णयासाठी ठेवणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ मधील रेणुकानगर शिवशंभो सोसायटी औरंगाबाद रोड ते श्री. डहाके घरादरम्यान ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे प्रकरणी श्री. दिलावर खान महेबुब खान, रा. अकबर नगर औरंगाबाद रोड यांनी मे. कोर्टात दाखल केलेला रे.मु.नं. ४८४/२००८ त्यांनी मे. कोर्टातुन मागे घेण्यात यावा. तद्नंतरच सदर प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यांत यावा.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०० शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०० शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा भाडे तत्वावर मिळणेबाबत कमांडींग ऑफिसर, ५७ महाराष्ट्र बटालीयन एन.सी.सी. नगर- मनमाड रोड यांचा व वरिष्ठ भुवैज्ञनिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग ५८५ दिनांक १२/१/२०११ फेरसादर,

मा.उपायुक्त (कर) यांचे समवेत, मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेर सादर करणेत येत आहे.

मा. कमांडींग ऑफिसर एन.सी.सी. कार्यालय,अ.नगर यांनी दि.१४/६/२०१० रोजी पत्रद्वारे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील पहिल्या मजल्यावरील जागाची मागणी केली आहे. तद्नंतर दि.३/९/२०१० रोजी उक्त जागेसाठी वरीष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण,अ.नगर यांनी उशिराने मागणी केली आहे.

सावेडी गावठाण येथील म.न.पा.चे मालकीच्या शॉ. सेंटर मधील गाळा क्र. १ ते १२ सध्या कमांडींग ऑफिसर एन.सी.सी.अ,.नगर यांचेकडे भाडे तत्वावर असून ती जागा ते वापरत आहे. सदर मुळसंचिकाचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे अहवाल देत आहे.

कमांडींग ऑफिसर ५७ महा. बटालियन,अ.नगर (NCC) यांनी तत्कालीन मा.स्थायी समिती ठराव क्र.६३ दि.२/३/१९९३ अन्वये मंजुर ठरावानुसार दि.२८/८/९७ रोजी करारनामा करून जागा वापरत आहे. सदरच्या करारनाम्यात गाळा क्र. १ ते १२ चे भाडे रू.२१०६४/- निश्चित केलेले असून करारनाम्याची ९ वर्षाची मुदतीकरीता जागा अटी शर्तीवर भाडे पट्टयाने देणेत आलेली आहे.

सदरच्या करारनाम्या मध्ये एकूण १ ते २४ अटी शर्ती असुन, त्यामध्ये अट क्र. ३ मध्ये सदरचे निश्चित केलेले भाडे हे तीन वर्षाकरीता लागु राहील. व त्यानंतर प्रत्येक तीन वर्षानी किमान १५% टक्के अथवा महानगरपालिका अधिनियम १९९५ चे कलम ९२ अन्वये गठीत झालेल्या त्रिसदस्यीय समितीत निश्चित केलेली वाढ यापैकी जी जास्त असेल अशी भाडे वाढ करण्यांत येईल. पहिल्या ३वर्षाकरीता २५% व पुढील प्रत्येकी १५% किंवा समिती ठरविल याप्रमाणे अट आहे. याप्रमाणे करारनामा केलेला आहे.

सन २००३ मध्ये अहमदनगर महापालिका आस्तीत्वात आली आहे. सदरच्या NCC कार्यालयाने दि.१७ सप्टें. २००८ रोजी म.न.पा. पत्र देवुन भाडे वाढीबाबत १ ते ६ मुद्दे उपस्थित केले आहे. त्याद्वारे भाडे आकारणी इत्यादीबाबत मुद्दे मांडले आहे. परंतु तत्कालीन मार्केट विभाग लिपिक, प्रमुख व वसुली अधिक्षक यांनी सदर प्रकरणाची दक्षता न घेता सदरचा विचार केला नाही व सदरच्या कार्यालयास माहिती पुरविली नाही. तसेच या कार्यालयास भाडे वाढ अनियमित पणे केली आहे. सध्या सदरचे कार्यालयास भाडे जुन्या दराने वाढ न करता आकारणी केलेली आढळून आली आहे. व सदरचे कार्यालयाने वार्षिक भाडे पट्टाचा भरणा जुन्या दराने करीत आहे. त्यामुळे म.न.पा. आर्थिक नुकसान होवुन मोठया प्रमाणावर महसुल बुडाला आहे.

सदरची आर्थिक असल्याने गंभीर स्वरूपाची आहे. व अक्षम्य अशी चुक केली आहे. याबाबत तत्कालीन मार्केट विभागातील कार्यरत कर्मचारी व वसुली अधिक्षक जबाबदार आहेत. संबंधीत कर्मचा-यावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व एम.सी.एस.आर. नुसार कर्तव्यात कसुर केल्याने कार्यालयीन कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याकरीता संबंधीत कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून चौकशी प्रस्तावीत करणे योग्य आहे.

कमांडींग ऑफिसर NCC या कार्यालयाने सन १९९७ साली केलेल्या करारनाम्यानुसार पुढे मासिक भाडयात किंचीतशी वाढ करून रू.२१०६४/- बीले पाठविण्यांत आलेली आहे. सदरचे कार्यालय बिलांप्रमाणे पैसे न भरणा वार्षिक रू.१,८०,०००/- चा भरणा करीत आहे. उक्त करारनाम्यानुसार सन १९९७ पासून मासिक भाडे पट्टयाची परिगणना करणे आहे. कार्यालयाने कमी भाडे जमा केल्याने त्यांचेकडे सद्यपरिस्थितीत रू.१४,८५,६५७/- एवढी थकबाकी येणे आहे. तसेच करारनाम्यातील अटी शर्ती भंग झालेला आहे. तसेच सदर कार्यालय हे केंद्र शासनाचे आहे. याबाबतही तत्कालीन २००८ साली मार्केट विभागाने पुढील कार्यवाही केलेली नाही.

दि.२२/१२/२०१० रोजी मा.आयुक्त सो., यांचे स्वीय सहाय्यक यांचे दुरध्वनी वरील संदेशानुसार कमांडींग ऑफिसर सह NCC कार्यालयातील अधिकारी तसेच वरिष्ठ भु वैज्ञानिक व भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,अ.नगर या कार्यालयाचे अधिकारी यांचे समवेत समक्ष जागेवर जावुन जागेची मागणी बाबत चर्चा केली असता, कमांडींग ऑफिसर NCC अ.नगर यांनी सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट मधील मागणी केलेली सर्व जागाची आवश्यकता असेलबाबत सांगितले. त्यामध्ये इतर कोणालाही जागा देवु नये असे स्पष्ट सांगितले.

मा. नगररचनाकार ,म.न.पा.अ,.नगर यांनी त्यांचे पत्र क्र. टी.पी. २५७० दि.२३/९/२०१० अन्वये क्षेत्रफळानुसार केलेली आकारणी बाबत दिलेल्या पत्रानुसार उक्त जागेचे भाडे रू.४३,३१४/- प्रति महिना निश्चित केलेले आहे. तसेच यामध्ये मालमत्ता कर, लाईट बिल, इत्यादी खर्च स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. अशा प्रकारे शिफारस केली आहे. उक्त प्रमाणे वस्तुस्थिती असल्याने जागा मागणीबाबतचा प्रथम अर्ज असणारे कमांडींग ऑफिसर,५७ महा. बटालियन अ.नगर यांचा असल्याने त्यांचा विचार होणे आवश्यक आहे.तथापी त्यांचेकडे सावेडी गावठाण शॉ. सेंटर मधील १ ते १२ गाळयावरिल थकीत भाडयाची रक्कम आहे. याबाबत त्यांना माहिती दिलेली असून थकीत रक्कम वसुल करणेबाबत पुढिल पत्रव्यवहार करणे व थकीत रक्कम जमा झालेवर त्यांचा अर्जाचा विचार करणे योग्य होईल. किंवा त्यांचेकडून निश्चित केलेले भाडे व मागील थकीत रक्कम भरणेबाबत संमती पत्र घेवुन विचार करणे ही योग्य वाटते.

तरी सावित्रीबाई भाजी मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील संपूर्ण जागा भाडे तत्वावर भुजल वैज्ञानिक किंवा मा. कमांडींग ऑफिसर ५७ महा. बटालियन अ.नगर यांना देणे किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समिती अ.नगर महापालिका अ.नगर यांचेकडे पाठविणेबाबत सविनय सादर असे.

येणे प्रमाणे मार्केट विभाग वरिष्ठ लिपिक यांचा अहवाल असे.

सहा. मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी :- सादर,

मुख्य लेखा परिक्षक :- कमांडींग ऑफिसर एन.सी.सी. कार्यालयास सावित्रीबाई भाजी मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील जागा भाडयाने देणे, नवीन भाडे ठरविणे व त्यांचेकडील थकीत भाडे रक्कम वसुल करणे इ. बाबतचा विषय स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवणेत यावा.

मुख्य लेखा अधिकारी :- रजेवर

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. दि.२९/१२/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा कमांडींग ऑफिसर ५७, महाराष्ट्र बटलियन एन.सी.सी. किंवा वरिष्ठ भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना भाडे तत्वावर देणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव वाचुन दाखावावा.

मार्केट विभाग श्री. बनसोड : सावित्री बाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा भाडे तत्वावर मिळणेबाबत कमांडींग ऑफिसर ५७ महाराष्ट्र बटलियन एन.सी.सी. नगर-मनमाड रोड व वरिष्ठ भु वैज्ञाणिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांनी अर्ज केलेले आहेत. सदर जागा कंमाडींग ऑफिसर ५७ महाराष्ट्र बटलियन एन.सी.सी. यांना त्यांच्या अर्ज प्रथम असल्याने देणेबाबत शिफारस करण्यात आली होती. दरम्यान वरिष्ठ भु वैज्ञाणिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांचा अर्ज आला आहे. कमांडींग ऑफिसर ५७ महाराष्ट्र बटलियन एन.सी.सी. नगर-मनमाड रोड यांचेकडेस सावेडी गावठाण येथील मनपाचे शॉपींग सेंटर मधील भाडे कराराने असलेल्या गाळा क्र.१ ते १२ चे भाडे रूपये १४,८५,६५७/- इतकी त्यांचेकडेस थकबाकी आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- त्यांचेकडेस असलेल्या थकबाकीची रक्कम वसुल केले नंतरच त्यांना भाडे कराराने जागा देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- या जागेचे भाडे किती आहे.

मार्केट विभाग श्री. बनसोड :- रूपये ४३३१४/- प्रती महिना याप्रमाणे जागेचे भाडे नगररचना विभागाने निश्चित केलेले आहे. तसेच त्यांना मालमत्ता कर, लाईट बील खर्च स्वतंत्र भरणे आहे.

मा.श्री.पवार बा.रे. :- एन.सी.सी. ऑफिस कडेस थकबाकी असलेने सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा अर्जदार वरिष्ठ भु वैज्ञाणिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांना भाडे कराराने देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- वरिष्ठ भु वैज्ञाणिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांना भाडे कराराने जागा देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- कमांडींग ऑफिसर ५७ महाराष्ट्र बटलियन एन.सी.सी. नगर मनमाड रोड यांचेकडेस गाळा भाडयाची थकबाकी असलेने सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरिल पहिले मजल्याची जागा वरिष्ठ भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांना भाडे कराराने देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, भाजी मार्केट वरील पहिले मजल्याची जागा वरिष्ठ भुवैज्ञनिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांना भाडे कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०१ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०१ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्र.४, अंतिम भूखंड क्रमांक १२९ (पैकी) सावेडी प्रोफेसर कॉलनी चौक येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाचे जागेत एफ.बी.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे कामी महासभा ठराव क्रमांक ३८ दिनांक २२/६/२०१० चे मंजूर अटीस अधिन राहून सदर प्रकल्पाची सुधारित वाढीव प्रिमियम रक्क्म रूपये १३ कोटी ५५ लाख इतकी निश्चित करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग दिनांक १४/१/२०११

सादर,

विषय- नगररचना योजना अहमदनगर क्र.४ अंतिम भुखंड क्र.१२९ (पैकी) सावेडी, प्रोफेसर कॉलनी चौक, येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाच्या जागेत F.B.T. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे बाबत.

संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र.३८ दि.२२/६/२०१० अन्वये दिलेली मंजुरी.

अहमदनगर महानगरपालिकेची व ताब्यात असलेली, प्रोफेसर कॉलनी चौक, येथील नगरररचना योजना अहमदनगर क्र.४अंतिम भुखंड क्र.१२९ ही जागा अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असुन, तेथे आरक्षण क्र.१८ अन्वये सांस्कृतिक केंद्र व ग्रंथालयाचे १०५आर. क्षेत्रावर आरक्षण असुन, उर्वरीत जागेवर अस्तित्वातील व्यापारी संकुल, अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत दर्शविलेले आहे.

पुर्वी एकात्मिक शहर विकास योजनेत हा प्रकल्प घेतलेला होता त्यामध्ये अस्तित्वातील तळमजला बांधकाम तसेच ठेवुन त्यावर नवीन दोन मजले बांधणे बाबतचा प्रस्ताव होता. मात्र स्ट्रक्चरल इंजिनिअर यांनी अस्तित्वातील इमारतीची दुरावस्था पाहता, त्यावर दोन मजले बांधकाम करणे योग्य होणार नाही. असा अहवाल दिलेला आहे. त्यामुळे एकात्मिक शहर विकास योजनेतुन सदर घटक वगळण्यात आला.

त्यानंतर मा. महासभा ठराव क्र.३८ दि.२२/६/२०१० अन्वये अस्तित्वातील जुने शॉपींग सेंटर पाडुन त्याठिकाणी खाजगी करणाच्या माध्यमातुन (F.B.T.) अद्ययावत व्यापारी संकुल विकसित करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे व या प्रकल्पातुन मिळणा-या प्रिमीयम मधुन व मा. शासनाकडुन मिळणा-या अनुदानामधुन लगतच्या आरक्षण क्र.१८ सांस्कृतिक केंद्र या जागेत जिल्हास्तरीय नाटयगृह उभारणे प्रस्तावीत आहे. मा.शासनाने जिल्हास्तरीय नाटयगृह उभारणेसाठी रू.२.०० कोटी इतका निधी तीन वर्षात देण्याचे आदेश पारीत केलेले असुन त्यापैकी रू.६० लाखाचा पहिला हप्ता महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. तसेच व्यापारी संकुलाचे बांधकाम स्वतंत्र असले. तरी नाटयगृह व व्यापारी संकुलाची जागा ही एकाच अंतिम भुखंडापैकी असल्याने नाटयगृहासाठी आवश्यक असणारा चटई निर्देशांक वापरून उर्वरीत सर्व अनुज्ञेय चटई निर्देशांक (F.S.I.) व्यापारी संकुलासाठी वापरणे योग्य होईल.

प्रोफेसर कॉलनी चौक परिसर हा सावेडी उपनगरातील सर्वात झपाटयाने विकसित होणारा प्रमुख भाग आहे. सदर भागात मा. शासनाची मध्यवर्ती इमारत, राज्यशासनाची विविध कार्यालये, आकाशवाणी केंद्र,दुरदर्शन केंद्र, मा. औद्योगीक व इतर न्यायालये त्या अनुषंगाने खाजगी विकासकाचे मोठे वाणीज्य प्रकल्प (हॉटेल, व्यापारी संकुले इत्यादी) बांधकामे लगतच्या परिसरात सुरू आहेत. तसेच जवळच अहमदनगर शहरातील सर्वात मोठे नोबेल हॉस्पीटल, बिग बाजार, माउत्ली व्यापारी संकुल इत्यादी लगतच्या परिसरात आहे. त्यामुळे सदर भागाचा झपाटयाने विकास झालेल्या असुन सदर भागातील जागेच्या किंमतीत मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे.

मा.महासभा ठराव क्र.३८ दि.२२/६/२०१० मध्ये नमुद केल्यानुसार सदर जागेचा ५.४६ कोटी इतका प्रिमीयम निश्चित केलेला असता. तरी सदर परिसरात झालेल्या विकासामुळे सदर जागेच्या मार्केट दरात मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री. मनोजकुमार जाधव यांनी नव्याने सुधारीत नकाशासह प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये प्रिमीयमची सुधारित दराप्रमाणे येणारी रक्कम रू.१३.५५ कोटी इतकी गृहीत धरलेली आहे. तसेच नियोजीत प्रकल्पात अस्तित्वातील गाळेधारकांचे पुर्नवसन सुध्दा विचारा घेतलेले आहे. तसेच प्रिमीयमची सुधारित रक्कम निश्चित करताना महानगरपालिकेस साधारणपणे बाजारभावानुसार सदर जागेचे मुल्य मिळेल असे गृहीत धरलेले आहे.

उपरोक्त नमुद सर्व बाबीच्या अनुषंगाने व मा. महासभा ठराव क्र.३८ दि.२२/६/२०१० मधील अटीस अधिन राहुन सदर प्रकल्पाची सुधारीत वाढीव प्रिमियमची रक्कम रू. १३.५५ कोटी इतकी निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर. **/अ**

येणेप्रमाणे नगररचना यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) :- Pul up thorough Cafo & Auodutor

मा.उपायुक्त (कर) :- प्रोफेसर कॉलनी चौक येथील आस्तीत्वात व्यापारी संकुलाच्या जागेत F.B.T. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे या करीता महासभा दि.२२/६/२०१० ठराव क्र.३८ नुसार सदर प्रकल्पाची सुधारीत वाढीव प्रिमीयम रू.१३.५५ कोटी निश्चित करणेबाबतचा विषय स्थायी समिती पुढे चर्चेसाठी ठेवणेत यावा.

मा.उपायुक्त(सा.):-प्रस्तावीत**"अ"**प्रमाणे स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणे योग्य मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक २/०२/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे नगररचना योजना क्रमांक ४ अंतिम भुखंड क्रमांक १२९ पैकी प्रोफेसर कॉलनी चौक येथील आस्तीत्वातील व्यापारी संकुलचे जागेत एफ.बी.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे कामी प्रिमियम रक्कम निश्चित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती द्यावी.

नगररचना विभाग श्री. बल्लाळ इंजि. :- नगररचना योजना क्रमांक ४ अंतिम भुखंड क्रमांक १२९ पैकी प्रोफेसर कॉलनी चौक येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाचे जागेत एफ.बी.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे कामी महासभेने मंजूर केल्याप्रमाणे सदर जागेचा रूपये ५ कोटी ४६ लाख इतका प्रिमियम निश्चित केलेला आहे. सदर परिसरात झालेल्या विकासामुळे सदर जागेचे

किंमती मध्ये वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने आर्किटेक्ट श्री. मनोजकुमार जाधव यांनी सुधारित नकाशासह प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये सुधारित दराप्रमाणे येणारी प्रिमियम रक्कम रूपये १३ कोटी ५५ लाख इतकी गृहित धरलेली आहे. त्यास मंजूरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- प्रिमियम रक्कम वाढवावी.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केटचे जागी चे शॉपींग सेंटर करिताची प्रिमीयम रक्कम निश्चित केलेली होती.

नगररचना विभाग श्री. बल्लाळ इंजि. :- नेहरू मार्केटचे बांधकाम एफ.बी.टी. तत्वावर करून घेणे कामी प्रिमियम रक्कम निश्चित करून जाहिर निविदा मागविल्या असता फक्त एका निविदेची विक्री झाली. परंतु त्यास कुणीही प्रतिसाद दिलेला नाही. पुन्हा जाहिर निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केटचे एफ.बी.टी. चे प्रस्तावामध्ये शहर अभियंता यांनी प्रिमियची रक्कम कशी निश्चित केली होती.

उपशहर अभियंता श्री. सातपुते :- सदर जागेचे बाजार भाव पहाता तसेच अधिका-याशी चर्चा करून प्रिमियमची रक्कम निश्चित केली होती.

मा.श्री. पवार बा.रे. :- नेहरून मार्केटची निविदा कुणी भरीत नाही. त्यामुळे प्रस्ताव मार्गी लागत नाही. प्रिमियम रक्कम कमी करून प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- प्रिमियम रक्कम वाढविल्यास कुणीही निविदा भरत नाहीत. नेहरू मार्केटचा अनुभव चांगला नाही. तेव्हा सदर जागेचे मुल्य रेडी रेकनर प्रमाणे निश्चित करून त्यामध्ये १० टक्के वाढ करून प्रिमियम रक्कम निश्चित करण्यांस मंजूरी देण्यांत यावी. त्याप्रमाणे प्रस्ताव क्रमांक १०१ व १०३ मंजूर करावे.

मा.श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. बारस्कर पो.ज. :- रेडी रेकनर प्रमाणे येणा-या रकमे मध्ये १० टक्के वाढ करून प्रिमियम रक्कम निश्चित करावी. त्याप्रमाणे प्रस्ताव क्रमांक १०१ व १०३ चे प्रस्ताव मंजूर करावे.

मा.सौ. ढोणे मा. सु. :- भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१९ बुरूडगांव रस्ता या जागेत सध्या व्यायाम शाळा सुरू असुन व्यायाम शाळेचे बांधकाम पाडू नये.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- व्यायाम शाळेची योजना केलेली आहे.तेथे अद्यायवत व्यायाम शाळा होणार आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- व्यायाम शाळा लवकरात लवकर बांधावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव क्रमांक एकशे एक व एकशे तीन चे प्रकरणी रेडी रेकनर प्रमाणे जागेचे किंमती मध्ये १० टक्के रक्कम जादा धरून प्रिमियम रक्कम निश्चित करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- नगररचना योजना क्रमांक ४ अंतिम भुखंड क्रमांक १२९ पैकी सावेडी प्रोफेसर कॉलनी चौक येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाचे जागेचे व नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्रमांक ९२ भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१९ या जागेचे शासनाचे रेडी रेकनर प्रमाणे येणारे जागेचे किंमतीचे रक्कमेत १०%(दहा टक्के) वाढ धरून प्रिमियमची रक्कम निश्चित करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्र.४, अंतिम भूखंड क्रमांक १२९ (पैकी) सावेडी प्रोफेसर कॉलनी चौक येथील अस्तित्वातील व्यापारी संकुलाचे जागेत एफ.बी.टी. तत्वावर व्यापारी संकुल उभारणे कामी महासभा ठराव क्रमांक ३८ दिनांक २२/६/२०१० चे मंजूर अटीस अधिन राहून सदर प्रकल्पाची सुधारित वाढीव प्रिमियम रक्कम ही मा. शासनाचे रेडी रेकनर प्रमाणे येणारे जागेचे किंमतीचे रकमेत १०%(दहा टक्के) वाढ धरून येणारी रक्कम ही प्रिमियम रक्कम म्हणून निश्चित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०२ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०२ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २,९६,०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अद्ययावत करणेबाबत.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अद्ययावत करणेसाठी तज्ञअधिकारी व कर्मचारी कंत्राटी पध्दतीने ६महिने कालावधी करीता नेमणुक करणेस मा.स्थायी समितीने ठराव क्र.१८दि.२८/७/२००९अन्वये मंजुरी दिलेली आहे. व तद्नंतर ऑफिस रिपोर्ट नुसार मा.स्थायी समितीने ठराव क्र.४९दि.२०/७/२०१०अन्वये सदर पथकास ६ महिने मुदतवाढ दिलेली आहे.

आता सदर कालावधी संपत आल्याने व म.न.पा. मिळकतीच्या नोंदी अद्ययावत करणेचे काम अद्याप बाकी असल्याने सदर पथकास पुर्वीच्याच ६ महिने करीता मंजुर केलेल्या रकमेवर रूपये दोन लाख शहान्नव हजार मात्र (रू. २,९६,०००/-) पुन्हा पुढील ६ महिनेसाठी मुदतवाढ देणे आवश्यक वाटते सबब सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे सादर करीत आहे.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगररचना विभागाकडेस कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २,९६,०००/- (रूपये दोन लाख शहाण्णव हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०३ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०३ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्र.९२ भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१९ बुरूडगाव रस्ता ही जागा एफ.बी.टी. तत्वावर विकसीत करणेस मा. महासभा ठराव क्रमांक ३९ दिनांक २२/६/२०१० मधील प्रिमियमची रक्कम वगळता उर्वरित बाबी कायम ठेवुन सुधारित नकाशासह प्रिमियम रक्कम रूपये १०,०४,२८,०००/- इतकी निश्‍चित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** जा.क्र. टी.पी.४६३५ दि.१७/२/२०११ प्रति- नगरसचिव,प्रेषक- नगररचनाकार प्रस्तावना-विषय- नगररचना योजना अहमदनगर क्र.३ अंतिम भुखंड क्र.९२ बुरूडगांव रस्ता भाजी मार्केट आरक्षण क्र.२१९ ही जागा F.B.T. तत्वावर विकसित करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मा. महासभा ठराव क्र.३९ दि.२२/६/२०१० अन्वये नगररचना योजना अहमदनगर क्र.३ अंतिम भुखंड क्र. ९२ बुरूडगाव रस्ता भाजी मार्केट आरक्षण क्र.२१९ ही संपुर्ण जागा F.B.T. च्या (खाजगीकरणाच्या) माध्यमातुन विकसित करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

यापुर्वी महासभा ठराव क्र.२० दि.१०/८/०९ अन्वये मंजुर केलेल्या ठरावाप्रमाणे विषयांकित जागेचे एकुण क्षेत्रापैकी व्यायामशाळेने व्यापलेली २२०४.०० चौ.मी. इतकी जागा सोडुन उर्वरित जागा विकसित करणेबाबत निर्णय झालेला होता. मात्र सदर जागा विकसित करणे बाबतच्या निविदेस प्रतिसाद न लाभल्यामुळे संदर्भिय सुधारित ठरावाप्रमाणे अस्तित्वातील व्यायामशाळा पाडुन सदर संपुर्ण जागेचे एकुण क्षेत्र ४९५७.०० चौ.मी. ही जागा F.B.T.च्या (खाजगीकरणाच्या) माध्यमातुन निविदा मागवुन विकसित करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय महासभेने घेतलेला आहे. व या सुधारित ठरावामध्ये सदर जागेचा रू. ३.६३ कोटी इतका प्रिमियम गृहीत धरण्यात आलेला आहे. तसेच सुधारित प्रकल्पात मुख्य इमारतीत व्यायामशाळा (GYMNACIAM) व भाजी मार्केट ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. व अस्तित्वातील व्यायामशाळा पाडणे बाबत निर्णय झालेला आहे.

तथापी उपरोक्त प्रिमीयम आकारणीचा मुळे अहवाल मार्च २०१० मध्ये तयार करण्यात आलेला असुन त्यावेळच्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितीत जागेच्या किंमतीत मोठा बदल झालेला आहे. व त्यानंतरच्या कालावधीत अहमदनगर शहरातील स्थावर मिळकतीच्या दरात मोठयाप्रमाणावर वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रिमीयम पोटी महानगरपालिकेस मार्केट दरानुसार जागेची किंमत सर्वसाधारण पणे मिळणे अभिप्रेत असल्याने सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री. मनोजकुमार जाधव यांनी नव्याने सुधारित नकाशासह प्रकल्प अहवाल इकडेस सादर केलेला आहे.

सदर प्रकल्प अहवालात महानगरपालिकेस प्रिमीयम पोटी मिळणारी रक्कम रूपये १०,०४,२८,०००/-(रूपये दहा कोटी चार लाख अठ्ठावीस हजार ) इतकी दर्शविलेली आहे. चालु बाजार भावाची पडताळणी केली असता, तसेच महानगरपालिकेच्या सदर जागेची एकुण किंमत पाहता मा. महासभेने ठराव क्र.३९ दि.२२/६/२०१० मधील प्रिमीयमची रक्कम वगळता उर्वरित बाबी कायम ठेउऩ

आर्किटेक्ट श्री. मनोजकुमार जाधव यांनी नव्याने सुधारित नकाशासह प्रकल्प अहवाल प्रिमीयमची सुधारित दराप्रमाणे येणारी रक्कम रू. १०,०४,२८,०००/-(रूपये दहा कोटी चार लाख अठ्ठावीस हजार ) इतकी निश्‍चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेत येत आहे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्र.९२ भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१९ बुरूडगाव रस्ता ही जागा एफ.बी.टी. तत्वावर विकसीत करणेस मा. महासभा ठराव क्रमांक ३९ दिनांक २२/६/२०१० मधील प्रिमियमची रक्कम वगळता उर्वरित बाबी कायम ठेवुन सुधारित नकाशासह प्रिमियम रक्कम ही मा.शासनाचे रेडी रेकनर प्रमाणे येणारे जागेचे किंमतीचे रकमेत १०%(दहा टक्के) वाढ धरून येणारी रक्कम ही प्रिमियम रक्कम म्हणून निश्‍चित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०४ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०४ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्टेशन रोड जुने बसस्थानक माळीवाडा येथील (वॉर्ड क्रमांक १९बील क्र. २३५) बंद नळ कनेक्शनची वसुल न होणारी थकबाकी निर्लेखित करण्यांस व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून १ इंची नळ कनेक्शनची पाणीपट्टी रूपये २२,०००/- प्रमाणे आकारण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** बुरूडगांव विभाग क्र.४ जा.क्र. ९१० दि.२२/२/२०११

प्रभारी नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

विषय- वॉर्ड क्र.१९ बिल क्र. २३५ जुने बसस्थानक येथील नळ पाणीपट्टीचे बील निर्लेखित करणेबाबत.

वॉर्ड क्र.१९ बिल क्र.२३५ जुने बसस्थानक येथे १ इंची नळजोड पाच कनेक्शन राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तत्कालीन नगरपरिषद असतांना घेतले होते. सदर कनेक्शनची सन २०००/२००१ अखेर रू. १३२०४६/- इतकी थकबाकी होती. राज्य मार्ग महामंडळाने दि.१७/३/२००१ रोजी निवेदन सादर करून पाच कनेक्शन बंद करणे बाबत कळविले होते. सदर नळास पाणी येत नाही. राज्य मार्ग परिवहन महामंडळ दररोज खाजगी टँकरद्वारे जुने बसस्थानक येथे पाणी पुरवठा केला जातो. असे कळविले होते. पंरतु तत्कालीन नगरपरिषदेने सदर निवेदनावर काही ही दखल घेतली नाही. दरवर्षी पाणीपट्टीचे बील आकारले जाते. सन २००९/२०१० अखेर पाच नळ कनेक्शनची थकबाकी रू.५७८९६४/- एवढी झाली.

म.न.पा. फिटरने दि.१०/३/२०१० रोजी समक्ष स्थळ पहाणी करून खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे. जुने बसस्थानक येथे १ इंची पाच कनेक्शन आहेत. त्यापैकी १ नळकनेक्शन चालु आहे व ४ नळकनेक्शन बंद आहेत १ इंच कनेक्शन थकबाकी सन २००१-२०१० पर्यत १८६३०४/- एवढी आहे तसेच व सन २००१-२०१० रूपये १३२०४६/- एवढी थकबाकी आहे. ४ नळकनेक्शन थकबाकी सन २००१-२०१० पर्यत २६०६१४/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार वसुल न होणारी थकबाकी निर्लेखित करणे व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासुन १ इंची नळकनेक्शनची पाणीपट्टी रूपये २२०००/- आकारण्यास व पुढील निर्णयास्तव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

**टिप-** रा. प. महामंडळाने सन २००१ ते २०११ पर्यंतची थकबाकी रू.३४०३५०/- पा.क्र.०२१९२० दि.१०/०१/११ रोजी भरले आहेत.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी प्रभाग समिती कार्या. क्र.४ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्टेशन रोड जुने बस स्थानक यांचे बंद नळ कनेक्शनची वसुल न होणारी थकबाकी निर्लेखित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

प्रभाग समिती कार्या क्र.४, श्री. बुचकुल :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तत्कालीन नगर परिषदेचे वेळी १ इंची , ५ नळ कनेक्शन घेतले होते. दिनांक १७/३/२०११ रोजी महामंडळाने निवदेन सादर करून नळास पाणी येत नसलेने सदरचे ५ नळ कनेक्शन बंद करणे बाबत कळविले होते. महानगरपालिका फिटरने सदर जागेची पहाणी समक्ष केली असतात तेथील ४ नळ कनेक्शन बंद व १ चालू असल्याचे आढळले सदरचे ४ नळ कनेक्शनाची थकबाकी निर्लेखित करणेस व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून १ इंची नळ कनेक्शनची पाणीपट्टी रू.२२,०००/- प्रमाणे आकारणेस मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे. राज्य परिवहन महामंडळाने त्यांचेकडील थकबाकी भरलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्टेशन रोड जुने बसस्थानक माळीवाडा येथील (वॉर्ड क्रमांक १९बील क्र. २३५) बंद नळ कनेक्शनची वसुल न होणारी थकबाकी निर्लेखित करण्यांस व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून १ इंची नळ कनेक्शनची पाणीपट्टी रूपये २२,०००/- (रूपये बावीस हजार फक्त) प्रमाणे आकारण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०५ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०५ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** विळद पंपींग स्टेशन येथून मौजे पिंपरी घुमट ग्रामपंचायत ता.नगर जिल्हा अहमदनगर या गांवासाठी विळद पंपींग स्टेशन येथून पिण्याच्या पाण्याचे १ इंची नळ कनेक्शन देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १६४१ दिनांक २२/२/२०११

प्रस्तावना-विषय- विळद पंपींग स्टेशन येथून पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देणेकामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत.

टिप्पणी- मौजे पिंपरी घुमट ग्रामपंचायत, ता.नगर , जिल्हा- अहमदनगर यांचे व मा. आमदार श्री. शिवाजीराव कर्डीले साहेब, अहमदनगर यांचे मा. महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांना अग्रेषीत प्राप्त पत्रानुसार सदरहू गावासाठी पाण्याची अत्यंत गैरसोय असल्याने विळद पंपींग स्टेशन मधून सदर गावास १" पिण्याच्या पाण्याची कनेक्शन देण्याची मागणी केलेली आहे.

परंतु तथापी अहमदनगर शहराकरिता पाण्याची उपलब्धता व दैंनदिन मागणी विचारात घेता तफावत निर्माण होत असल्याने आठवडयातून पाच दिवस पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे शहर पाणी पुरवठा योजनेवरून थेट पाणी पुरवठा करणे योग्य आहे.

तसेच मा.केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत केडगाव पाणी पुरवठा योजना मंजूर होते वेळी केडगाव प्रभागासाठी लागणा-या जादा पाण्यासाठी, मुख्य जलवाहिनीवरील असलेले सर्व नळ कनेक्शन बंद करण्यात येतील. असे प्रमाणपत्र महानगरपालिकेने मा. शासनास दिलेले आहे. व सदयस्थितीत केडगाव प्रभागासाठीच्या पाणी पुरवठा योजनेतील उर्ध्ववाहिनीचे काम जवळपास महिनाभराच्या अंतराने पूर्ण होणार आहे. यानंतर महानगरपालिकेस जादा पाण्याची आवश्यकता लागणार आहे.

या सर्व बाबी विचारात घेवून संबंधीत गावासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विळद पंपींग स्टेशन येथून पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देता येणार नाही. तथापी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बु-हानगर व ४४ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झालेली असल्याने या योजनेवरून त्यांचे गावासाठी नळ कनेक्शन घेणेचे करावे असे संबंधीतांना कळविणे अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये वरील आधोरेखीत प्रमाणे कार्यवाहीस मा.आयुक्त साहेब यांनी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तथापी संबधीत ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी मा. महापौर साहेब, मा.स्थायी समिती सभापती, आदी महोदयांकडे वारंवार तगादा करून कनेक्शन देण्याची मागणी करीत आहे. सबब वरील सर्व बाबी व निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेता सदरचा निर्णय धोरणात्मक स्वरूपाचा असल्यामुळे विषयांकित प्रस्तावाबाबत मा.स्थायी समितीसमोर चर्चेसाठी ठेवून, मा.स्थायी समितीच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करणे अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समितीसमोर निर्णयासाठी ठेवण्यांत यावे, असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा. सभापती साहेब :- विळद पंपिग स्टेशन येथून मौजे पिंपरी घुमट या गावासाठी पिण्याचे पाण्याचे १ इंची नळ कनेक्शन देणेस मंजूरी देणे आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- महानगरपालिका हद्दीमध्ये प्रथम पाणी देण्यांत यावे इतरांना नंतर द्यावे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- अहमदनगर शहरातील पाणीपुरवठा प्रथम सुरळीत करण्यांत यावा. यापुर्वी दिवसाआड पाणी पुरवठा कधीच होत नव्हता.

मा.श्री. पवार बा.रे. :- नळ कनेक्शन देण्यांस मंजूरी देण्यांत यावी. मात्र त्यांचेकडेस पाणीपट्टीचे बील थकल्यास पाणी पुरवठा बंद करण्यांत यावा.

मा.श्री. पवार द.ज. :- त्याप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मौजे पिंपरी घुमट ग्रांमपंचायत ता.नगर जि. अहमदनगर या गावासाठी विळद पंपींग स्टेशन येथून पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. मात्र त्यांचेकडेस पाणी पट्टीचे बील थकल्यास नळ कनेक्शन बंद करण्यांत यावे.

**<u>ठराव :-</u>** विळद पंपींग स्टेशन येथून मौजे पिंपरी घुमट ग्रामपंचायत ता.नगर जिल्हा अहमदनगर या गांवासाठी पिण्याच्या पाण्याचे १ इंची नळ कनेक्शन देणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

मात्र महानगरपालिकेचे नळ कनेक्शनची थकबाकी त्यांचेकडेस राहिल्यास सदरचा पाणी पुरवठा बंद करण्यांत यावा.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०६ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०६ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौन्डेशनचे एम.बी.ए. कॉलेज करिता २" इंची पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १६५९दिनांक २४/२/२०११

प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून २" नळ कनेक्शन मिळणेबाबत.

**टिप्पणी-** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे एम.बी.ए. कॉलेज, अहमदनगर या शैक्षणिक संस्थेने इकडेस दिनांक ०२/०२/२०१० रोजी विनंती अर्ज देवून कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थी व स्टाफ यांची राहण्याची होस्टेलमध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच महाविदयालयाच्या परिसरात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. म्हणून महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून २" पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

परंतु महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या व भविष्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता महानगरपालिका हद्दीबाहेर नळ कनेक्शन न-देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असल्याने व महानगरपालिकेस हद्दीबाहेर पाणी पुरवठा करणे बंधनकारक नसल्याने नळ कनेक्शन अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. असे सदरहू संस्थेस इकडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग १११३/०९ दि.०५/०३/२००९ अन्वये कळविण्यांत आलेले आहे.

तद्नंतर सदरहू शिक्षण संस्थेने दि.१५/१०/२०१० रोजी विषयांकित बाबत केलेली मागणी संदर्भ पाणी टंचाई लक्षात घेवून मा.आयुक्त साहेब यांचे दि.२/१२/२०१० रोजीच्या मंजूरी अन्वये नामंजूर करण्यांत आलेले आहे.

असे असताना संबधीतांनी मा. महापौर साहेब यांचेकडे दि.०९/०२/२०११ रोजी पुन्हा अर्ज करून कनेक्शन देण्याची मागणी केली असता, त्यामध्ये मा. महापौर साहेब यांनी सदरची बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्यामुळे विषयांकित प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करण्याची निर्देश दिलेले आहेत. करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवून, मा.स्थायी समितीच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करणे अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.आयुक्त साहेब यांनी मा. स्थायी समितीसमोर निर्णयासाठी ठेवण्यांत यावे, असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- डॉ. विठ्ठलराव विखे पाटिल फौन्डेशनचे एम.बी.ए. कॉलेज करिता २ इंची पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- आपण नळ कनेक्शन देणे ठिक आहे. परंतु त्यावर नियंत्रण कुणाचे रहाणार आहे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटिल फौन्डेशनचे एम.बी.ए. कॉलेज, अहमदनगर या संस्थेस पाण्याचे कनेक्शन दिले नंतर त्यावर मिटर लाउन पाणी पट्टीची आकारणी करण्यांत येणार आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- पाणी पट्टीची थकबाकी राहिल्यास नळ कनेक्शन बंद करण्यांत यावे या अटीवर नळ कनेक्शन देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- अटीवर नळ कनेक्शन देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतुन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटिल फौन्डेशनचे एम.बी.ए.कॉलेज करिता २" इंची पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. मात्र अहमदनगर महानगरपालिकेचे नळ कनेक्शची थकबाकी त्यांचेकडेस राहिल्यास सदरचा पाणी पुरवठा बंद करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौन्डेशनचे एम.बी.ए. कॉलेज करिता २" इंची पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

मात्र अहमदनगर महानगरपालिकेचे नळ कनेक्शनची थकबाकी त्यांचेकडेस राहिल्यास सदरचा पाणी पुरवठा बंद करण्यांत यावा.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०७ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०७ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता म.न.पा. हद्दीत जमा होणारा घनकचरा (ओल-सुका) चे संकलन वाहतुक व विल्हेवाट लावणे कामी आवश्यक वाहने खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये १,१२,०१,३५५/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन जा.क्र. ३९८ दि.२८/२/२०११

प्रति,
प्र. नगरसचिव ,
अहमदनगर महानगरपालिका

विषय- महानगरपालिका हद्दीत निर्माण होणारा घनकचरा (ओल- सुका) ची संपुर्ण शहरातुन घरोघर कचरा संकलन, वाहतुक व विल्हेवाट लावणेकामी आवश्यक लागणारे वाहने खरेदी करणे करीता येणा-या खर्चास मा.स्थायी समिती ची मंजूरी मिळण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीत निर्माण होणारा घनकचरा (ओल- सुका) ची संपुर्ण शहरातुन घरोघर कचरा संकलन, वाहतुक करणेकामी आवश्यक लागणारे वाहने खरेदी करणेबाबत दराची सिलबंद फेर निविदा दि.७/०२/११ ते दि.१५/०२/११ दरम्यान मागविण्यांत आली होती. वरील निविदा दि. १७/०२/२०११ रोजी उपायुक्त (कर) यांचे दालनात निविदा (तांत्रिक लिफाफा क्र. १ व दर पत्रक लिफाफा क्र.२ ) उघडण्यात आली. त्या वेळेस मे. बाफना ट्रॅक्टर शॉप नं.९ उज्वल कॉम्लेक्स, बस स्टॅण्ड मागे, अहमदनगर यांचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याचे दिसुन आले होते. त्यानुसार संबधीत अधिकृत विक्रेत्यास मा.उपायुक्त कर यांचे आदेशान्वये दि.२२/२/२०११ रोजी मा.उपायुक्त साहेब यांच्या समक्ष मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, मॅकेनिकल इंजि. व घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांच्या उपस्थित मध्ये सदर अधिकृत विक्रेत्यास बोलवुन वाटाघाटीमध्ये अधिकृत विक्रे खालील प्रमाणे दर लेखी पत्र देवुन मान्य केले.

त्यानुसार तक्ता क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर लेखी पत्र देवुन अधिकृत विक्रेत्याने मान्य केले आहेत.

| ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|
| वाहन प्रकार | निविदाकाराने निविदेमध्ये नमूद केलेला प्रति वाहन दर | वाटाघाटी नंतर एक टक्के कमी होणारी रक्कम | वाटाघाटी नंतर एक टक्के किंमत कमी केल्यावर मान्य केलेले प्रति वाहन दर |
| लोडर सह ५५ **HP** कॅटेगीरी | ८,९८,५००/- | ८९८५ | ८८९५१५/- |
| लोडर बॅकोसह ५५ **HP** कॅटेगीरी | १२,९९,०००/- | १२९९० | १२८६०१०/- |
| ४५**HP** कॅटेगीरी (४८ एच.पी.) | ५,५८,५००/- | ५५८५ | ५५२९१५/- |
| **ट्रॉली** : उंची २ फुट + २ फुट, लांबी १२ फुट, रूंदी ६ फुट हौदासहीत | १,९९,५००/- | १९९५ | १९७५०५/- |

तदनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागास आवश्यकते प्रमाणे खालील प्रमाणे वाहनांची संख्या विचारात घेता एकूण रक्कम रू. ११२०१३५५/-(अक्षरी रक्कम रू. एक कोटी बारा लाख एक हजार तीनशे पंच्यावन्न फक्त) खर्च अपेक्षीत आहे.

| वाहन प्रकार | वाटाघाटी नंतर मान्य केलेले प्रति वाहन दर | आवश्यक संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| लोडर सह ५५ **HP** कॅटेगीरी | ८८९५१५/- | २ | १७७९०३०/- |
| लोडर बॅकोसह ५५ **HP** कॅटेगीरी | १२८६०१०/- | १ | १२८६०१०/- |
| ४५**HP** कॅटेगीरी (४८ एच.पी.) | ५५२९१५/- | ९ | ४९७६२३५/- |
| **ट्रॉली** : उंची २ फुट + २ फुट, लांबी १२ फुट, रूंदी ६ फुट हौदासहीत | १९७५०५/- | १६ | ३१६००८०/- |
| | | **एकूण** | ११२०१३५५/- |

तरी वाटाघाटी नंतर मान्य करण्यात आलेल्या दरानुसार वरीलप्रमाणे आवश्यक ती वाहने खरेदी करण्यासाठी रक्कम रूपये ११२०१३५५/- (अक्षरी रक्कम रू. एक कोटी बारा लाख एक हजार तीनशे पंच्यावन्न फक्त) च्या अंतीम मंजूरीसाठी ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे उपआरोग्य अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता मनपा हद्दीत जमा होणारा घनकचरा (ओल-सुका) चे संकलन वाहतुक व विल्हेवाट लावणे कामी आवश्यक वाहने खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये १,१२,०१,३५५/- चे खर्चास मंजूरी देणेबाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. पवार बा.रे. :- किती वाहने खरेदी करणे आहेत प्रस्तावाची माहिती सांगावी.

उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर :- महानगरपालिका हद्दीत निर्माण होणारा घनकचरा (ओला-सुका) घरोघरी जावुन संकलन करणे व वाहतुक करणेकामी आवश्यक वाहने खरेदी कामी जाहिर निविदा मागविल्या असता अधिकृत विक्रेते मे. बाफना ट्रॅक्टर,अ.नगर यंचे कमीचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यांनी लोडर सह ५५ एच.पी. कॅटेगीरी २, लोडर बॅकोसह ५५ एच.पी. कॅटेगीरी १ व ४५ एच.पी. कॅटेगीरी (४८ एच.पी.) ९ व ट्रॉली उंची २ फुट + २ फुट लांबी १२ फुट रूंदी ६ फुट हौदासह याप्रमाणे १६ ट्रॉली खरेदी करणे आहे. सदरचे वाहनांना अपोलो / सिएट टायर असावेत.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- पूर्ण सदस्यांची स्थायी समिती अस्तित्वात आले नंतर हा विषय सभेमध्ये निर्णयासाठी घ्यावा भिंगारवाला (सीना नदी ) वरील पुलाचे काम रद्द केले का ? पावसाळयाचे दिवसात नागरिकांचे हाल होतात. पुलाची तरतुद या कामासाठी वापरली तर पुलाचे काम होणार नाही.

उपशहर अभियंता श्री. सातपुते :- बारावे वित्त आयोगाचे निधी मधुन पुलाचे काम प्रस्तावीत केले होते. परंतु संबंधीत मंजूर ठेकेदार यांनी पुलाचे काम सुरू केलेले नाही. मार्च महिन्याचे अगोदर बारावे वित्त आयोगाचे अंतर्गत मनपास मिळणारी निधी खर्च केला नाही तर निधी परत जाणार आहे. त्यामुळे पुलाचे कामाचे निधी मधुन सदर वाहन खरेदी करणेचा प्रस्ताव आरोग्य विभागामार्फत सादर केलेला आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- भिंगार नाल्या वरील पुलाचे काम करण्यांत यावे. मार्च पूर्वी बारावे वित्त आयोगाअंतर्गत मिळणारा निधी खर्च होणे आवश्यक असलेने आलेले प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता म.न.पा. हद्दीत जमा होणारा घनकचरा (ओल-सुका) चे संकलन वाहतुक व विल्हेवाट लावणे कामीचे निविदा दर धारक मे. बाफना ट्रॅक्टर शॉप नं.९ उज्वल कॉम्लेक्स, बस स्टॉन्ड मागे, अहमदनगर यांनी कमी करून दिलेल्या कमीचे दरास व त्याकामी येणारे रक्कम रूपये १,१२,०१,३५५/-(अक्षरी रक्कम रूपये एक कोटी बारा लाख एक हजार तीनशे पंच्यावन्न फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. सदरचे वाहनांना अपोलो / सिएट टायर असावेत. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०८ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०८ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम, पाणी पुरवठा व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता पदी मानधनावर नेमणूका करणेकामी शैक्षणिक अर्हता ठरविणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर:-**प्रस्तावना-विषय-बांधकाम व पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी मानधनावर करार बध्द नियुक्ती करिता शैक्षणिक अर्हते बाबत.

सादर,

अहमदनगर शहराचा नागरी वस्तीचा विस्तार वाढत असुन राबविण्यांत येत असलेल्या सदर योजनेची जलद गतीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आस्थापना कायम सुचीवर कनिष्ठ अभियंताची मंजुर पद संख्या १४ असुन २ पदे रिक्त आहेत व सहाय्यक नगररचनाकार पदांची मंजुर पदे ३ असुन सद्यस्थितीमध्ये रिक्त नाही. आस्थापना कायम सुचीवरील कनिष्ठ अभियंत्याची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे विविध विकास कामामध्ये दिरंगाई होत असले बाबत विविध वर्तमानपत्रामधुन बातम्या प्रसिध्द होत आहेत. त्यामुळे वेळोवेळी संयुक्त बैठकीमध्ये पाणीपुरवठा व बांधकाम विभाग प्रमुख यांनी बांधकाम व पाणीपुरवठा, घन कचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत वेळोवेळी मागणी करीत आहे.

तरी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी करारनुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता पदसंख्ये प्रमाणे शैक्षणिक अर्हता ठरविणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयाकरीता मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

| अ.क्र. | विभागाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | मोटर व्हेईकल विभाग | डिप्लोमा इन ॲटोमोबाइल इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य | १ |
| २ | पाणी पुरवठा विभाग | १) डिप्लोमा इन सिव्हील इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>२) डिप्लोमा इन मॅके. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य | ४<br>२ |
| ३ | बांधकाम विभाग | डिप्लोमा इन सिव्हील इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य | ५ |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | १)डिप्लोमा इन सिव्हील इंजि./ पर्यावरण इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>२) डिप्लोमा इ. मॅके. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य | १<br>१ |
| ५ | विद्युत विभाग | डिप्लोमा इन. इले. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य | १ |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे बांधकाम , पाणी पुरवठा, मोटार व्हेईकल, विदयुत व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार कनिष्ठ अभियंता पदी नेमणूक करणेकामी शैक्षणिक अर्हता ठरविणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम, पाणी पुरवठा,मोटार व्हेईकल, विदुयत व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता पदी मानधनावर नेमणूका करणेकामी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता ठरविणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | मोटर व्हेईकल विभाग | डिप्लोमा इन ॲटोमोबाइल इंजि.<br>पदवीधर उमेदवारास प्राधान्य |
| २ | पाणी पुरवठा विभाग | १) डिप्लोमा इन सिव्हील इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>२) डिप्लोमा इन मॅके. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य |
| ३ | बांधकाम विभाग | डिप्लोमा इन सिव्हील इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | १)डिप्लोमा इन सिव्हील इंजि./ पर्यावरण इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>२) डिप्लोमा इन मॅके. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य |
| ५ | विद्युत विभाग | डिप्लोमा इन. इले. इंजि. पदवीधर उमेदवारास प्राधान्य |

ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-१०९ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

ठराव क्रमांक -१०९ शुक्रवार दिनांक ११/३/२०११

**प्रस्तावाचा विषयः-**मा.स्थायी समिती ठराव क्र.८७दि.१२/१/२०११चा अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन या पदांची संख्या शैक्षणिक अर्हता व वाढीव मानधन ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** आस्थापना विभाग दिनांक २८/२/२०११

विषय- रक्तपेढी विभागा करिता कंत्राटी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन या पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता व वाढीव मानधन ठरविणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे निर्णया करीता ठेवणे बाबत.

संदर्भ :- १) मा.स्थायी समिती ठराव क्र.८७ दिनांक १२/१/२०११ चा ठराव

२)मा.प्रभारीआरोग्यअधिकारी यांचेकडीलजा.क्र.आरोग्य विभाग१२४३दि.२२/२/२०११चा प्रस्ताव

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.प्रभारी आरोग्य अधिकारी यांचे मागणी नुसार रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी मानधनावर भरती बाबत वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देण्यांत आलेली होती.

सदर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे मानधन कमी असल्यामुळे उमेदवारांचा मुलाखती करिता अल्पशा प्रमाणात प्रतिसाद मिळालेला होता.

त्यामुळे रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार मानधनावरील तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे मानधन वाढी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजुरीसाठी निर्णयाकरिता सादर करण्यांत आलेला होता. परंतु सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८७ दिनांक १२/१/२०११ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदास चांगला प्रतिसाद मिळणेसाठी एकत्रित मानधन एम.बी.बी. एस. पदवी धारकास रूपये १०,०००/- ऐवजी १५,०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदवी धारकास रूपये १५,०००/- ऐवजी रू.२०,०००/- याप्रमाणे वाढीव मानधन देणेबाबत प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत यावा.

प्रशासनाने अनुभव, शिक्षण व ब्लड बॅकेतील बाबत कायदयातील तरतुदी या बाबत सविस्तर प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णसासाठी सादर करावा."

सदर उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन पदांबाबत पात्रता व वाढीव मानधन व तद्अनुंषगीक माहिती सादर करणेबाबत इकडील जा.क्र. आस्थापना ३७९१ दिनांक २१/२/२०११ अन्वये मा. प्रभारी आरोग्य अधिकारी , आरोग्य विभाग यांना पत्रान्वये कळविण्यांत आलेले होते.

मा.प्रभारी आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे कडील जा.क्र.आरोग्य विभाग१२४३ दिनांक २२/२/२०११अन्वये पत्र देवुन त्यामध्ये"अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागाकरिता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८७ दिनांक १२/१/२०११अन्वये वैद्यकीय अधिकारी व लॅब टेक्नीशियन इ.पदांबाबत ड्रग्ज अॅन्ड कॉस्मेटीक्स अॅक्ट१९४०कलम १२२जी,व शेडयल एफ ड्रग्ज अॅण्ड कॉस्मेटीक्स

रूल्स १९४५ भाग xII बी व १२२ पी अन्वये रक्तपेढी २४ तास कार्यरत असल्याने सदर पदांबाबत अपेक्षित माहिती खालील प्रमाणे देणेत येत आहे.

**अ) पात्रता व अनुभवा बाबत.**

| | |
|---|---|
| **१.**वैद्यकीय अधिकारी | शैक्षणिक पात्रता |
| | अ) एम.डी. (पॅथॉलॉजी) किंवा ट्रान्सफ्युजन मेडीसीन किंवा |
| | ब) एम.बी.बी.एस. डिप्लोमा इन पॅथॉलॉजी किंवा ट्रान्सफ्युजन मेडिसीन किंवा |
| | क) एम.बी.बी.एस. एक वर्षाचा रक्तपेढी विभागाचे कामाचा अनुभव |
| २.लॅब टेक्निशयन- | अ) एम.एल.टी. पदवी व सहा महिने रक्तपेढी कामाचा अनुभव |
| | ब) डि.एम.एल. टी. व एक वर्ष रक्तपेढी कामाचा अनुभव, मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदविका |

**ब) मानधनाबाबत**

ड्रग्ज अॅण्ड कॉस्मेटीक्स अॅक्ट मधील कलम १२२ पी (ए) अन्वये रक्तपेढी २४ तास कार्यरत असल्याने प्रत्येक शिफ्ट मध्ये पुरेसे कर्मचारी वर्ग कार्यरत ठेवणे आवश्यक आहे. याबाबत आस्थापना विभागाने रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात असणारे वैद्यकीय अधिकारी पदाचे मानधन वाढविणे बाबतचे प्रस्तावाप्रमाणे "अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग करीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदासाठी वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिरात देण्यात आलेली आहे. परंतु उमेदवारांचा अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. सध्या सदर वैद्यकीय अधिकारी पदास एकत्रित मानधन एम.बी.बी.एस.साठी रू.१००००/- व एम.डी.पॅथॉलॉजिस्ट पदांसाठी रू.१५०००/- असे आहे. तथापी सदरचे मानधन रू.१००००/- ऐवजी २००००/- करणे आवश्यक आहे. त्याबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घेणे आवश्यक आहे. तथापी वर्तमान पत्रातील जाहिरातीस उमेदवारांचा चांगला प्रतिसाद मिळणेसाठी जाहिरातीमध्ये मानधन वाढ प्रस्तावीत अशी टीप नमुद आहे. त्यास मान्यता मिळावी व उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर पदाकरीता मानधन वाढी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी ठेवणेबाबत आदेशार्थ सादर." असा प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रस्तावाचे अवलोकन करता मा.स्थायी समिती नं.७८ दिनांक १०/१२/२०१० अन्वये यापुर्वी डॉ. सुरेखा गउळकर वैद्यकीय अधिकारी यांना रू.२००००/- प्रतिमहिना मानधन मंजुर करण्यांत आलेले आहे. तसेच लॅब टेक्नीशियन श्रीमती पल्लवी मोरे यांना रू. १३०००/- प्रतिमहिना मानधन मंजुर करण्यांत आलेले आहे.

तरी रक्तपेढी कामकाज अन्न व औषध प्रशासनाचे नियमावलीतील तरतुदीनुसार सुरळीत चालवण्यासाठी मा.मंत्री महोदय, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक १२/१०/२०१० चे रक्तपेढी परवाना निलंबित प्रकरणी दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यांत येवुन मा.स्थायी समिती ठराव नं.७८ दिनांक १०/१२/२०१० नुसार व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातुन मान्यता देणे उचित वाटते."असे नमुद केलेले आहे.

मा.नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१००५/वर्गीकरण/ प्र.क्र. ३७९/०५/नवि-२४ दिनांक ४ मे २००६ अन्वये महानगरपालिका सेवांची ३ सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांच्या पदांसाठी आकृतीबंध निश्चित करणे बाबतच्या परिपत्रकामध्ये ३(१) नुसार महानगरपालिकेच्या

आस्थापना खर्चावर नियंत्रण राहण्यासाठी जास्तीत जास्त ३५% एवढी खर्चाची मर्यादा ठेवण्यांत येत असलेबाबत स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिके मधील कर्मचा-यांना सहावा वेतन आयोगाच्या शिफारशी लागु करण्यांत आलेल्या असुन त्यामुळे कर्मचा-यांच्या वेतनामध्ये अंदाजे ७० लाख इतका दरमहा अतिरिक्त खर्चामध्ये वाढ झालेली आहे.

आस्थापनाच्या सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये खर्चाची टक्केवारी ५४:५०% इतकी झालेली आहे.

त्यामुळे आस्थापना खर्चामधील वाढलेली टक्केवारी बाबत गांर्भीयाने विचार होणे आवश्यक झालेले आहे.

रक्तपेढी विभागामार्फत नागरिकांना रक्त पुरवठा करून सुविधा दिली जाते. सदर रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेमध्ये असुन २४ तास कार्यरत ठेवावे लागते. त्यामुळे आस्थापना सुचीवरील रक्तपेढी विभागाकरीता वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्निशियन इ. पदांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे अत्यावश्यक सेवाचा विचार करता रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन दरमहा मानधनावर भरणेबाबत मागणी मा. प्रभारी आरोग्य अधिकारी यांनी केलेली आहे.

मा. प्रभारी आरोग्य अधिकारी यांचे मागणी मुळे रक्तपेढी विभागा करिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन या पदांची संख्या व प्रस्तावामध्ये नमुद केल्या प्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करणे बाबत व त्यांचे दरमहा मानधन ठरविणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८७ दिनांक १२/१/२०११ च्या ठरावाच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव निर्णया करीता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे झाल्यास या बाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- वैद्यकीय अधिकारी व लॅब टेक्शीशियन पदाची शैक्षणिक पात्रता व मानधन व पद संख्या इ. ठरविणे बाबतचा विषय स्थायी समिती पुढे चर्चेसाठी घेणेत यावा.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावीत "अ" प्रमाणे प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर. दि.५/३/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक ५/३/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन या पदांची संख्या शैक्षणिक अर्हता व वाढीव मानधन ठरविणे बाबत प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

आस्थापना प्रमुख श्री. अशोक साबळे :- महानगरपालिकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी करारानुसार मानधनावर वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूका करणे कामी वर्तमानपत्रामध्ये वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली. परंतु त्यास अल्पसा प्रतिसाद मिळाला सदर पदाचे मानधन वाढी बाबत प्रस्ताव सादर केला असता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८७ दिनांक १२/०१/२०११ अन्वये एम.बी.बी.एस. पदवी धारकास रूपये १५०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदवी धारकास रूपये २००००/- या प्रमाणे मानधन वाढीचा प्रस्ताव स्थगित ठेवावा प्रशासनाने

अनुभव शिक्षण व ब्लड बॅके बाबत कायदयातील तरतुदी याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करणे या प्रमाणे पारित केलेल्या ठरावानुसार शैक्षणिक अर्हता पदाची संख्या व वाढीव मानधन ठरविणेबाबत प्रस्ताव सभेपुढे सादर केलेला आहे.

मा.श्री.पवार द.ज.:-ऑफिस रिपोर्टानुसार शैक्षणिकपात्रता व कामाचा अनुभव पाहून मानधन देण्यांत यावे.

मा.श्री. पवार बा.रे. :- रक्तपेढी विभाग चोवीस तास कार्यरत राहिल इतका स्टाफ नेमण्यांत यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- वैद्यकीय अधिकारी यांचेसाठी रूपये २० हजार व लॅब टेक्नीशियन पदासाठी रूपये १३ हजार या प्रमाणे मानधन निश्चित करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- वैद्यकीय अधिकारी व लॅब टेक्नीशियन या पदासाठी ऑफिस रिपोर्टानुसार शैक्षणिक पात्रता व अनुभव ठरविणेस तसेच वैद्यकीय अधिकारी पदासाठी रूपये २०हजार व लॅब टेक्निशियन पदासाठी रूपये १३ हजार याप्रमाणे दरमहा मानधन ठरविण्यांस तसेच रक्तपेढी विभाग दिवसाचे चोवीस तास कार्यरत राहिल या प्रमाणे पदांची संख्या निश्चित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी ३ व लॅब टेक्निशियन १ या पदासाठी पात्रता व शैक्षणिक , अनुभव व मानधन खालीलप्रमाणे

| **अ) पात्रता व अनुभवा बाबत.** | | |
|---|---|---|
| **१.**वैद्यकीय अधिकारी | शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन रूपये |
| | अ) एम.डी. (पॅथॉलॉजी) किंवा ट्रान्सफ्युजन मेडीसीन किंवा<br>ब) एम.बी.बी.एस. डिप्लोमा इन पॅथॉलॉजी किंवा ट्रान्सफ्युजन मेडिसीन किंवा<br>क) एम.बी.बी.एस. एक वर्षाचा रक्तपेढी विभागाचे कामाचा अनुभव | रू. २०,०००/- |
| २.लॅब टेक्निशयन- | अ) एम.एल.टी. पदवी व सहा महिने रक्तपेढी कामाचा अनुभव<br>ब) डि.एम.एल. टी. व एक वर्ष रक्तपेढी कामाचा अनुभव, मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदविका | रू. १३,०००/- |

याप्रमाणे निश्चित करण्यांस व रक्त पेढी विभाग दिवसाचे २४ तास कार्यरत ठेवणे कामी सध्या अस्तित्वात असलेल्या आदेशातील कालावधीपासून मानधन वाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमादेक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका